## प्रकरण ३ रे

# साहित्याचा अभ्यास : स्वरूप आणि विश्लेषण

# प्रकरण ३ रे

# साहित्याचा अभ्यास : स्वरूप आणि विश्लेषण

१. **प्रास्ताविक**

२. **'साहित्याचा अभ्यास' : अभ्यासक्षेत्र**

३. **समीक्षा**

३.१ साहित्यकृती - साहित्यप्रकार

३.२ साहित्यकृतिनिष्ठ अभ्यास

३.२.१ साहित्यकृती म्हणजे काय ?

३.२.२ साहित्यकृतीचे वाचन

३.२.३ आशयविश्लेषण व अर्थनिर्णयन

३.२.४ टीकाकारांची मते

३.२.५ साहित्यकृतीची अंगे व विविध दृष्टिकोण

३.२.६ साहित्यकृतीच्या संरचनेचे विश्लेषण

३.२.७ मूल्यमापन

३.३ लेखकनिष्ठ अभ्यास

३.३.१ लेखकाचे जीवन आणि व्यक्तिमत्त्व

३.३.२ देशकाल परिस्थिती

३.३.३ प्रकृतीधर्म

३.३.४ वाङ्मयीन वातावरण

३.३.५ लेखकाने हाताळलेला वाङ्मयप्रकार

३.३.६ वाङ्मयकृतीतून प्रकट होणाऱ्या आशयाचे स्वरूप

३.३.७ लेखकाचा मूल्यात्म दृष्टिकोण

३.३.८ वाङ्मयनिर्मितीची परंपरा आणि नवता

३.३.९ समकालीन व उत्तरकालीन लेखकांवरील प्रभाव

३.३.१० वाङ्मयेतिहासातील लेखकाचे स्थान

३.४ साहित्यप्रकारनिष्ठ अभ्यास

३.४.१ कलांचे वर्गीकरण

३.४.२ सुखात्मिका

३.४.३ वर्गीकरणाला आव्हान
३.४.३.१ कांट
३.४.३.२ क्रोचे
३.४.३.३ रूपवाद व आव्हाने
३.४.३.४ संरचनावाद
३.४.३.५ भावकाव्याचा करार
३.५ वाङ्मयाच्या कालखंडाचा अभ्यास
३.५.१ काल आणि कालखंड
३.५.२ कालखंड मानण्याची गमके
३.५.३ अभ्यासाच्या अटी
३.५.४ एक प्रश्न
३.५.५ अभ्यासाचे महत्त्व
३.६ प्रबंधलेखन - रीत
३.६.१ संशोधन म्हणजे काय ?
३.६.२ संशोधनाच्या पद्धती
३.६.३ अभ्युपगमाचे महत्त्व
३.६.४ साहित्य संशोधन
३.६.५ साहित्य संशोधनाचे प्रकार
३.६.६ विषयाची निवड
३.६.७ वाचन केव्हा व कसे करावे ?
३.६.८ पुद्ठिकांचा उपयोग
३.६.९ तळटीपांचा उद्देश व पद्धत
३.६.१० संदर्भाचे तंत्र
३.६.११ तत्रैव आणि उनि योजना
३.६.१२ प्रबंधाची विभागणी
३.६.१३ प्रबंधाची शैली.
**४ रत्नाकर मंचरकर यांचे समीक्षा लेखन**
४.१ संत साहित्य
४.१.१ ज्ञानेश्वरीतील तत्त्वविचार

४.१.२ नामदेवांच्या कवितेतील नवता
४.१.३ एकनाथांचा तौलानिक अभ्यास
४.१.४ संत साहित्याच्या समीक्षेची समीक्षा
४.२ पंडिती परंपरेचे स्वरूप
४.३ धर्मसंप्रदाय आणि वाङ्मय
४.४ साहित्यिक भूगोल
४.५ वाङ्मयाचा इतिहास
४.६ तौलानिक साहित्य
४.७ कवी आणि कविता
४.८ कथा आणि कथाकार
४.९ कादंबरी आणि कादंबरीकार
४.१० विष्णूशास्त्री चिपळूणकरांचे तीन निबंध
४.११ चरित्र - आत्मचरित्र - प्रवासवर्णने
४.१२ नवप्रवाह
४.१३ स्त्रीवादी साहित्य व समीक्षा
४.१४ समीक्षा विचार
४.१५ साहित्य विचार
४.१६ साहित्याचे संशोधन
४.१७ भाषाशास्त्र विचार
४.१८ वाङ्मयतेतर विषयावरील लेखन
**५. र. बा. मंचरकर व्यक्तिविशेष**

# प्रकरण ३ रे

# साहित्याचा अभ्यास : स्वरूप आणि विश्लेषण

**प्रास्ताविक :-**

गुरूवर्य र. बा. मंचरकर सद्भाव समिती दूवारे संपादित करण्यात आलेला 'साहित्याचा अभ्यास' हा र. बा. मंचरकर यांच्याविषयी सद्भाव व्यक्त करणारा आगळा वेगळा गौरवग्रंथ आहे. र. बा. मंचकर यांनी आपले संपूर्ण आयुष्य अध्ययन - अध्यापन, संशोधन - समीक्षा यांमध्ये व्यतीत केलेले आहे. मंचरकर सरांविषयी रा. चिं. ढेरे म्हणतात - ''आजच्या पिढीत अध्ययन-अध्यापनात सर्वस्वाने रंगलेला आणि सर्व प्रसिद्धीतंत्रापासून दूर राहून केवळ अभ्यासानेच प्रकटणारा त्यांच्या कसाचा दुसरा शिक्षण सापडणे फार दुर्मिळ आहे.'' अशा व्यासंगी आणि निष्ठावंत गुरूच्या 'ऋणातून उतराई होणे' याच प्रेरणेतून हा गौरवग्रंथ सिद्ध झालेला आहे. गुरूच्या ज्ञानसाधनेविषयी वाटणारा सद्भाव येथे गौरवग्रंथात साकारलेला आहे.

'साहित्याचा अभ्यास' या गौरवग्रंथांची मांडणी दोन विभागात केलेली आहे. लौकिकतावादी व अलौकिकतावादी. अशा दोन्ही प्रकारांमध्ये सामावणाऱ्या भूमिकेतून साहित्याचा अभ्यास येथे करण्यात आलेला आहे. साहित्याच्या अभ्यासाविषयी अनुक्रमे -

१) साहित्याचा अभ्यास - प्राचार्य प्रभाकर बागले

२) साहित्यकृतीचा अभ्यास - हरिश्चंद्र थोरात

३) लेखकाचा अभ्यास - बाळकृष्ण कवठेकर

४) साहित्यप्रकाराचा अभ्यास - मिलिंद मालशे

५) वाङ्मयाच्या कालखंडाचा अभ्यास - द. दि. पुंडे

६) प्रबंधलेखन रीती - सुधाकर देशपांडे

इ. लेख गौरवग्रंथाच्या पहिल्या विभागात आलेले आहेत तर गौरवग्रंथाच्या दुसऱ्या विभागात -

७) र. बा. मंचकर यांचे समीक्षा लेखन - सौ. वैशाली श्रीकृष्ण भालसिंग

८) रत्नाकर बापूराव मंचरकर ( कविता) - श्री. संतोष पद्माकर पवार

९) 'रत्नाकर' - श्री. एन. एम. आव्हाड

१०) 'लेकीचे पत्र' - सौ. अनुराधा संजय बंगाळ

इ. लेख व्यक्तिविशेष स्पष्ट करणारे आहेत.

## २) 'साहित्याचा अभ्यास' : अभ्यासक्षेत्र :-

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांपासून पीएच. डी. सारख्या व्यापक विषयांवर संशोधन करणाऱ्या मराठी संशोधकाला, सर्वांनाच साहित्यकृती, साहित्यप्रकार, वाङ्मयीन कालखंड यांचा अभ्यास निश्चितपणे करावा लागतो. मात्र मराठी समीक्षेमध्ये यावर स्वतंत्र विचार झालेला नाही हे लक्षात घेऊनच महाराष्ट्रातील व्यासंगी अभ्यासकांचे प्रस्तुत विषयांवरील विवेचन गौरवग्रंथातील समीक्षेमध्ये आलेले आहे.

साहित्याच्या अभ्यासांचा आवाका आणि त्याचं अभ्यासक्षेत्र 'सारकथन' या आनंद घाटुगडे यांच्या लेखातून स्पष्ट झालेले आहे. साहित्याचा अभ्यास करण्यासाठी आस्वादन, वर्णन-विश्लेषण, तुलना, वर्गीकरण इ. चा वापर करावा लागतो त्याचप्रमाणे आकलन, विश्लेषण, अर्थनिर्णयन, संश्लेषण, मूल्यमापन, शब्दांकन इ. प्रक्रियांमधूनच जावे लागते हे दिसून येते. साहित्याच्या अभ्यासाचे स्वरूप कसे विविधांगी आहे हेच येथे स्पष्ट झालेले आहे. एखाद्या साहित्यकृतीचा कसा विविधांगी अभ्यास करता येतो हे स्पष्ट करताना, आंतररचनेचा शोध घेणारा (स्वरूपनिष्ठ), निर्मितीच्या अंगाने (लेखकनिष्ठ), आस्वाद व परिणाम यांच्या अंगाने (वाचकनिष्ठ) तर समाज व साहित्य यांच्या अंगाने (अनुबंधलक्ष्यी) इ. वेध घेतल्याचे दिसून येते. साहित्याच्या स्वरूपाची मीमांसा करण्यासाठी वर्णन-विश्लेषण मार्गाने जावे लागते. साहित्याची कारणमीमांसा करण्यासाठी उत्पत्ती मार्गाने जावे लागते, याचेच विश्लेषण झाले आहे.

गौरवग्रंथाच्या दुसऱ्या विभागात र. बा. मंचरकर यांचे व्यक्तिगत जीवन व वाङ्मयीन कर्तृत्व यांचा परामर्श घेतल्याचे दिसून येते. ह्याकडे निव्वळ व्यक्तिगत म्हणून पाहण्यापेक्षा साहित्याभ्यासाचे अनुकरणीय उदाहरण म्हणून पाहिले गेलेले आहे. व्यक्तिगत जीवन व वाङ्मयीन कर्तृत्व यांच्या अनुषंगाने व्यक्तिविशेष स्पष्ट करणाऱ्या या लेखांमधून जिव्हाळा व ताटस्थ यामध्ये समतोल राखला गेलेला आहे. र. बा. मंचरकर यांच्या बहुआयामी व्यक्तिमत्त्वाचे पैलू उलघडून दाखविल्याचे दिसून येतात.

## ३. समीक्षा :-

र. बा. मंचकर यांचे व्यक्तिगत जीवन व वाङ्मयीन कर्तृत्व यांबरोबरच समीक्षादृष्ट्या साहित्याच्या विविध अंगोपांगांचा विचार आल्याचे दिसून येते. साहित्य व समीक्षा या दोन्ही परंपरांचे जाणकर तसेच इंग्रजी व मराठी साहित्याचे समीक्षक, 'अनुष्टुभ' चे साक्षेपी संपादक, प्राचार्य प्रभाकर बागले यांचा 'साहित्याचा अभ्यास' हा लेख सर्व अभ्यासप्रकारांची बैठक स्पष्ट करणारा आहे. हे लेखन जरी निमित्ताने झाले असले तरी ते चिंतनीय आहे हे दिसून येते.

साहित्य तसेच भाषा याविषयी विशेषत: कादंबरीसारखा दीर्घ तसेच विशाल आवाक्याच्या वाङ्मय प्रकारा संदर्भात उपयोजन हरिश्चंद्र थोरात यांच्या 'साहित्यकृतीचा अभ्यास' या लेखात आलेले आहे. दलित साहित्याचे अभ्यासक समकालीन समीक्षक बाळकृष्ण कवठेकर यांनी 'लेखकाचा अभ्यास' कसा

करावा याचे विवेचन केलेले आहे, हेच दिसून येते. इंग्रजी साहित्याचे अभ्यासक व मराठीचे समीक्षक मिलिंद मालशे यांनी 'साहित्य प्रकाराचा अभ्यास' याचे विवेचन स्पष्ट केलेले आहे.

भारतीय भाषासाहित्याने तुलनाकार आणि भाषा, साहित्य व संस्कृती यांचा वेध घेणारे समीक्षक द. दि. पुंडे यांनी 'वाङ्मयाचा कालखंडाचा अभ्यास' याचा घेतलेला परामर्श आलेला आहे. कवी, कथाकार, समीक्षक असा मराठी वाङ्मयामध्ये स्वत:चा ठसा उमटविणारे सुधाकर देशपांडे यांची प्रबंधलेखन रीत स्पष्ट दिसून येते.

मराठी वाङ्मयामध्ये अभ्यासाची शिस्त रूजविण्याचा हा प्रयत्न या समीक्षेतून झाल्याचे दिसून येते. साहित्याच्या अभ्यासाचा हा प्रयत्न वाचक संस्कृतीला उत्तेजना देणारा आहे, हेच दिसून येते. 'साहित्याचा अभ्यास' हा गौरवग्रंथ गुरूवर्य र. बा. मंचकर या वाङ्मयउपासकांविषयी केवळ सद्भाव व्यक्त करणारा गौरवग्रंथ नसून तो महाविद्यालयीन विद्यार्थी त्याचप्रमाणे संशोधकांनाही उपयुक्त आहे हेच दिसून येते.

## ३.१ साहित्यकृती व साहित्यप्रकार :-

र. बा.मंचकर यांच्या गौरवग्रंथाच्या प्रारंभी 'साहित्याचा अभ्यास' हा लेख प्राचार्य प्रभाकर बागले यांचा येतो. साहित्य आणि समीक्षा या दोन्ही परंपरांचे जाणकार तसेच अनुष्टुभचे सक्षमी संपादक प्राचार्य प्रभाकर बागले तत्त्वविचेक आहेत आणि त्यांची हीच प्रतिमा प्रस्तुत लेखातून सिद्ध झालेली आहे. एकाच वेळी बहुविध विषयांना न्याय देण्याची त्यांची सचोटी तसेच प्रस्तुत लेखन जरी 'निमित्ताने' झाले असले तरी चिंतनीय ठरलेले आहे. गुरूचा निरपेक्ष गौरव करून एक आश्वासक संदर्भ ग्रंथ तयार होत आहे यात त्यांनी धन्यता मानली आहे. लेखाच्या सुरूवातीलाच त्यांनी साहित्याच्या अभ्यासातील उणीवा स्पष्ट केलेल्या आहेत. भौतिक सुखाच्या ओढीने उत्पादक आणि उपयुक्त शिक्षणाकडे झुकलेल्या आजच्या विद्यार्थ्यांचे कल्पनाशील संज्ञेकडे दुर्लक्ष होत आहे. 'साहित्याचा अभ्यास' हा सर्जनशील कार्य करून 'मी' ला व्यापक करतो. आपले संवेदन सर्जक करण्यासाठी साहित्याच्या अभ्यासाची प्रस्तुता अधोरिखित झालेली आहे.

या लेखात साहित्याच्या अभ्यासाची गरज आहे काय ? तो करावा असे वातावरण आहे काय ? ते प्रतिकूल असेल तर त्याची कारणे कोणती ? साहित्याचा अभ्यास कोणकोणत्या अंगांनी करता येतो याचाच विचार केलेला आहे. साहित्याचा अभ्यास प्रामुख्याने चार अंगाने करता येतो. ( १) साहित्यकृतीचा अभ्यास २) साहित्यप्रकाराचा अभ्यास ३) लेखकाचा अभ्यास ४) कालखंडाचा अभ्यास) त्यात नवीन भर टाकता येऊ शकते काय ? प्रभाकर बागले यांच्या मते ''साहित्य समीक्षेत ज्या नवनव्या अभ्यासपद्धती येत आहेत - त्या विदेशी पाहुण्यांना देशी माजघरात कुठपर्यंत नेता येईल, हा अभ्यास फलद्रूप झाला हे

केव्हा म्हणता येईल; साहित्यात प्रतिबिंबित होणाऱ्या मूलभूत भावभावनांबाबत देशी-विदेशी असे काही म्हणता येईल का ? या प्रश्नांना या लेखात स्पर्श केलेला आहे.''[१]

१९६० नंतर शिक्षण संस्थांमध्ये जी वाढ झाली आणि विद्यार्थी वर्गात जो बदल घडून आला; वैज्ञानिक प्रगतीमुळे उंचावणारा भौतिक स्तर त्यांना खुणावु लागला. उपयुक्तता या शब्दाने अनुत्पादक कसा बेदखल झाला आणि कलाशाखेतील सर्वात सुलभ विषय म्हणजे मराठी वाङ्मय समजले जाऊ लागले आणि यातूनच वाढलेली साहित्य अभ्यासाची आवश्यकता स्पष्ट झालेली आहे. अभ्यासकाला खुल्या मनाने सांस्कृतिक तसेच वाङ्मयीन विश्वाकडे पाहता आले पाहिजे. अभ्यासकाजवळ साहित्याला मुक्त प्रतिसाद देण्याची क्षमता हवी, हेच दिसून येते.

आजही वाङ्मय मोठ्या प्रमाणावर प्रसिद्ध होत आहे. पुस्तकांचा चांगला खप आहे, 'वाचन संस्कृती विस्तारते आहे' आणि असेही म्हटले जाते की, 'वाचन संस्कृती क्षणी होत आहे.' साहित्याच्या अभ्यास क्षेत्रातील हाच विरोधाभास इथे स्पष्ट झालेला आहे. साहित्याचा अभ्यास संवेदनेला सर्जनशील बनवून 'मी' ला कसा व्यापक करतो तसेच दिशा दर्शन स्पष्ट झालेले आहे. हे सारे प्रयत्न व त्यांचे यश अभ्यासक - वाचकाच्या प्रतिसाद क्षमतेवर अवलंबून असते हे दिसून येते. या संदर्भात वाचन प्रतिसादाबावत डी. डब्ल्यू. हार्डिंग यांचे विवेचन लक्षणीय वाटते. साहित्यकृतीच्या मानसशास्त्रीय वाचनक्रियेविषयीचे प्रतिसादाचे प्रामुख्याने चार प्रकार दिलेले आहेत.

१) **कृतीलक्ष्यी प्रतिसाद** - यात प्रत्यक्ष कृती अभिप्रेत आहे. वाचन ही एक कृतीच आहे, हे स्पष्ट झालेले आहे.

२) **संवेदनानिष्ठ प्रतिसाद** - संवेदन पातळीवरील प्रतिसाद अभिप्रेत आहे. संहितेतील दृश्य प्रतिसाद मनाला गुंतवून टाकते.

३)**आकलननिष्ठ प्रतिसाद** - हा आकलनाच्या पातळीवरील प्रतिसाद आहे. कलावस्तूचे आकलन यात अभिप्रेत आहे.

४) **मूल्यनिष्ठ प्रतिसाद** - हा प्रतिसाद मूल्यमापनाच्या पातळीवरील असतो. वाचक तटस्थपणे कलाकृतीकडे पाहतो.

अशा रितीने कृतीलक्ष्यी, संवेदननिष्ठ, आकलननिष्ठ व मूल्यनिष्ठ प्रतिसादाचे विवेचन आलेले आहे.

संहिता आणि वाचक यांच्या सहसर्जक प्रतिसादातून सौंदर्यवस्तू अस्तित्त्वात येते हेच दिसून येते. लेखकनिष्ठ संहिताकेंद्री विचाराकडून आता वाचकनिष्ठ प्रतिसादकेंद्री विचाराकडे जाण्याची निकड कशी आहे याचे दिग्दर्शन आलेले आहे. त्यानुसार कलाकृतीचे वस्तुनिष्ठ, वाचकनिरपेक्ष अस्तित्व आणि

वाचकांनी व्यक्तिनिष्ठ संज्ञा यांच्या द्वंद्वावर, त्यातील क्रियेवर अभ्यासकाने लक्ष केंद्रित करावे याचे विश्लेषण आलेले आहे. समीक्षकाच्या भावलक्ष्यी प्रतिसादाला विचारलक्ष्यी करण्यासाठी विविध ज्ञानशाखा व समीक्षा या साऱ्यांचा कसा उपयोग होतो हेच स्पष्ट केलेले आहे. त्यातून त्यांनी वाङ्मयसृष्टीतील तारतम्य हेच साहित्याभासाचे फलित आहे हे दिसून येते.

साहित्यकृती, साहित्यप्रकार, लेखक व कालखंड ही क्रमाने विकसित होणारी अभ्यासाची साखळी मानून एकेक साहित्य अभ्यासप्रकारचे क्रमश: विवेचन आलेले आहे. ज्या साहित्यकृतीने एकात्म स्वरूपाचा प्रत्यय दिला ती कोणत्या स्वरूपातील आहे ? कविता ? कथा ? कादंबरी ? की नाटक ? या प्रत्येक प्रकाराला परंपरा तसेच इतिहास आहे. त्या प्रकारच्या परिवर्तनशील इतिहासाची माहिती अभ्यासकाला असणे आवश्यक असते याचेच विवेचन आलेले आहे.

या संदर्भात कादंबरीचे उदाहरण घेतलेले आहे. त्यामधील कथानक प्रारंभ - मध्य - अंत असतो. कादंबरीकारांनी या संकेतांचे पालन केलेले असते. यासाठीच रंगनाथ पाठारे यांच्या 'नामुष्कीचे स्वगत' चे उदाहरण घेतलेले आहे. या कादंबरीत पात्र आहेत, प्रसंग आहेत, घटना आहे, नग्न वास्तव आहे, फॅन्टसी आहे, स्मृतीचे कथन आहे, साहित्यकृतीचे वस्तुनिष्ठ अर्थनिर्णयन, तिचे कार्य, ते करण्याची पद्धती, रूप व प्रकार यांच्यातील आंतरसंबंध, संकेतातीत होण्याची क्षमता इ. साहित्यप्रकारांच्या अभ्यासात महत्त्वाचे स्थान दिलेले आहे. साहित्यप्रकारांच्या अभ्यासात संकेत व त्यांचा इतिहास यांनाच महत्त्व दिले आहे, हेच दिसून येते.

वाङ्मयाच्या अभ्यासात लेखकाचा समग्र अभ्यासही महत्त्वाचा मानला आहे. एखाद्या लेखकाने एकच प्रकार हाताळलेला आहे तर दुसऱ्याने एकाचवेळी दुसराही साहित्य प्रकार हाताळलेला आहे, असे दिसून येते. काही लेखक एकापेक्षा अधिक साहित्यप्रकार हाताळण्यात कवितेकडून नाटकाकडे किंवा कथेकडे जातना दिसून येतात. हा रूपबदल अभ्यासकाला सहजपणे पाहता आला पाहिजे. या संदर्भात श्याम मनोहर यांचे उदाहरण आलेले आहे. त्यांनी कादंबरी व नाटक हे साहित्यप्रकार हाताळलेले आहेत. रंगभूमीकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोण स्वत:चा असा आहे. वाचकसापेक्ष साहित्यकृती लिहिणे आणि प्रेक्षकसापेक्ष साहित्यकृती लिहिणे यात फरक असला असे यात अभिप्रायाचे संप्रेषण महत्त्वपूर्ण आहे. एक संप्रेषण भाषेद्वारे होत आहे तर दुसरे कृतीद्वारे ! एकूणच लेखकाच्या अभ्यासात लेखकाची संवेदनशीलता, अभिरूची, पिंडधर्म आणि परिप्रेक्ष्य यांच्या चौकशीतील अभ्यास वैशिष्ट्यपूर्ण मानला गेलेला आहे.

विशिष्ट कालखंडाच्या अभ्यासात 'युगधर्म आणि साहित्य' यांच्यातील नाते शोधण्यावर भर दिलेला आहे. लेखकाने लिहिलेल्या कालखंडात त्याचा एक गुणधर्म आहे आणि हे सार (युगधर्म) व्यामिश्र स्वरूपाचे आहे. कालखंडाच्या अभ्यासात त्या कालखंडातील श्रद्धांचाही विचार आलेला आहे.

साहित्यकृतीचा, साहित्यप्रकाराचा तर्कनिष्ठ अभ्यास कशासाठी करावयाचया ? या प्रश्नाचा विचार झालेला आहे. याचेच प्रतिपादन आलेले आहे. या प्रतिसादाला शब्दरूप दिले की - एक प्रतिसंहिता तयार होते, हेच दिसून येते. याच्या पुष्ठ्यर्थ ज्येष्ठ समीक्षक प्रा. गंगाधर पाटील[२] यांचे 'अनुष्टुभ' सप्टे.- ऑक्टो. ८७ च्या अंकातील समीक्षाविषयक विचार स्पष्ट केलेले आहेत. त्यांच्या मते ''आपला अभिप्राय दुसऱ्याला सांगणे, तो शब्दातून व्यक्त करणे ही मानवी मनाची सहजप्रवृत्ती आहे. या प्रवृत्तीला आविष्काराची प्रेरणा असे म्हटले आहे. या प्रेरणेतूनच साहित्याची निर्मिती होते. त्याच न्यायाने साहित्यकृती विषयीचा आपला अनुभव दुसऱ्यास सांगावा वाटतो. त्याच शब्दातून आविष्कार करावा वाटतो. म्हणून समीक्षा करणे हा मानवाच्या प्रवृत्तीचा सहजधर्म आहे... ती एक सांस्कृतिक गरज आहे.'' गंगाधर पाटील यांचा हा समीक्षा विचार समीक्षेविषयीची भीती घालविणारा आहे. वाचकाला समीक्षा व्यवहारात सहभागी करून घेणारा आहे, हेच दिसून येते.

साहित्याच्या अभ्यासाची चार अंगे अशा रीतीने परस्परांशी निगडीत आहेत, परस्परपूरक आहेत. अभ्यासाची सोय म्हणून या प्रत्येक अंगांचा स्वतंत्रपणे विचार केलेला आहे. साहित्याच्या अभ्यासाला सैद्धांतिक, संकल्पनात्मक परिमाण लाभले की, साहित्याभ्यासाला संशोधन मूल्य प्राप्त होते हेच दिसून येते.

अभ्यासकाला आपला अभ्यास अधिक पुढे न्यायचा असेल, संशोधनाच्या दिशेने न्यायचा असेल तर समीक्षा-संहितांच्या वाचनांवर लक्ष केंद्रित केले पाहिजे. त्याने संहिताचे वाचन करून समीक्षा संहितेची निर्मिती केली पाहिजेच, हाच विचार मांडलेला आहे.

प्रभाकर बागले यांनी अभ्यास व समीक्षा एकच मानून चिंतन केलेले आहे. संशोधनाचा वेगळेपणा त्यांनी संकल्पनात्मक पातळीवर शोधला आहे. तथ्यलक्ष्यी आणि अनुबंधलक्ष्यी या संशोधनाच्या इतर प्रकारांचा पायाभूत सामग्रीचा वापर करून अभ्यास केलेला आहे. एकूणच यात संकल्पनात्मक पातळीवरील अभ्यास सुचविला आहे. हेच दिसून येते.

## ३.२ साहित्यकृतीनिष्ठ अभ्यास :-

साहित्य आणि भाषा याविषयीच्या अत्याधुनिक विचारप्रणालींचे, मराठी साहित्याच्या विशेषत: कादंबरीसारख्या व्यापक आवाक्याच्या विषयांवर प्रभुत्व असणारे डॉ. हरिश्चंद्र थोरात यांच्या 'साहित्यकृतीचा अभ्यास' हा लेख आलेला आहे.

'साहित्यकृतीचा अभ्यास' या लेखाच्या सुरूवातीलाच या विषयाच्या संदर्भातील व्यावहारीक अर्थाचा विचार केलेला आहे. यातील पहिला साहित्याच्या निर्मितीचा आणि साहित्यात रस घेण्याचा आहे. 'साहित्यकृतीचा अभ्यास' हा सात टप्प्यात मांडलेला आहे.

### ३.२.१ साहित्यकृती म्हणजे काय ?

या जटील प्रश्नाचा विचार आलेला आहे. तात्विक पातळीवरून विचार केल्यास साहित्यकृतीची संकल्पना कशी गुंतागुंतीची आहे याचाही विचार केलेला आहे. साहित्यकृतीबद्‌दलच्या तात्त्विक व्यूहात न शिरता, केवळ त्यांच्या अस्तित्वाचे भान राखत व्यावहारिक दृष्टिकोण स्वीकारलेला आहे. साहित्यकृतीचे अभ्यासविषयक विवेचन करता तिच्या स्वरूपावर प्रकाश टाकलेला आहे. एखादी चार ओळींची कविता ही साहित्यकृती असते त्याचबरोबर आकाशाएवढा विस्तीर्ण व्याप असणारी 'ताम्रपट' सारखी कादंबरीही साहित्यकृतीच असते हा विचार मांडलेला आहे. दिवाकरांची नाट्यछटा ही साहित्यकृतीच असते आणि शिरवाडकरांचे 'नटसम्राट' ही साहित्यकृतीच असते, हेच दिसून येते. या विविध प्रकारच्या साहित्यकृतींचा अभ्यास, त्यांच्यातील साम्यभेद, त्यांचा अभ्यास करताना वापराव्या लागणाऱ्या पद्‌धती इ. विवेचन आलेले आहे.

### ३.२.२ साहित्यकृतीचे वाचन :-

साहित्यकृतीचा अभ्यास करताना तिचा पहिला टप्पा म्हणजे तिचे वाचन कसे-कसे करावे यांचे दीर्घ विवेचन केलेले आहे. प्रथम साहित्यकृतीचे एक-दोन वेळा नीट वाचन करावे हे सांगणे थोडे हास्यास्पद असले तरी त्याची आवश्यकता आहे, याचे प्रतिपादन केलेले आहे. विद्यार्थी किंवा इतर वाचकही साहित्यकृतीचे कोऱ्या मनाने वाचन करत नाही. शक्यतो जी साहित्यकृती अभ्यसायची असले ती साहित्यकृती वाचण्याअगोदर इतर अभ्यास समीक्षकांनी तिच्यावर जे लिहिले असेल ते वाचू नये. पहिल्या टप्प्यावरच्या वचनात आपला व साहित्यकृतीचा सरळ संबंध येणे गरजेचे आहे हेच स्पष्ट झालेले आहे. या टप्प्यावर साहित्यकृती काय सांगते आहे याच विचारावर भर दिलेला आहे. त्यासंदर्भात काही गृहितकेही मांडलेली आहेत. परंतु साहित्यविषयक व्यूह गुंतागुंतीचे झाल्यामुळे ही गृहितकेही युक्तीवादासह खोडून काढता येतात.

साहित्यकृतीच्या संदर्भातील दुसरा केंद्रबिंदू साहित्यप्रकार हा मानलेला आहे. प्रत्येक साहित्यकृतीला साहित्यप्रकारचा संदर्भ आहे. आपण अभ्यासायची साहित्यकृती ज्या साहित्यप्रकारात मोडते त्या साहित्यप्रकारातील साहित्यकृतीच्या निर्मितीवेळचे वातावरण ही साहित्यकृती सांगते. या संदर्भात 'सात सक्कं त्रेचाळीस' सारख्या कादंबरीचा अभ्यास मांडलेला आहे.

साहित्यप्रकार व लेखक यांच्या संदर्भात दुसरे व तिसरे वाचन करावे हेच स्पष्ट करण्यात आलेले आहे. लेखक तसेच साहित्यप्रकार या दोहोंची पार्श्वभूमी स्पष्ट करून घेतल्यानंतर अभ्यासायची साहित्यकृती पुन्हा वाचली तर पूर्वीच्या वाचनापेक्षा तिसऱ्या वाचनात बराच फरक पडतो. हे दिसून येते.

### ३.२.३ आशयविश्लेषण व अर्थनिर्वचन :-

साहित्यकृतीचे पहिले-दुसरे-तिसरे वाचन झाल्यानंतर जी कच्ची टिपणे जवळ असता त्यांच्याच आधारे साहित्यकृतीचे विश्लेषण केले जाते. साहित्यकृतीचे आशयविश्लेषण आणि अर्थनिर्णयन या संदर्भात विलास सारंग यांच्या 'एन्कीच्या राज्यात' या कांदबरीचे उदाहरणे घेतलेले आहे. पहिल्या तीन वाचनात ( एन्कीच्या राज्यात ) या संदर्भात जे जाणवले ते नीट तपासून घ्यावे लागते. यासाठी 'एन्कीच्या राज्यात' चा एक छोटासा संहिताखंड निवडून घेतलेला आहे. सर्वसाधारण कादंबरीच्या आशयसूत्राला स्पर्श करणारा तुकडा पहिल्याच प्रकरणात मिळालेला आहे आणि हा भाग प्रमुख पात्र प्रमोद वेंगुर्लेकरांशी संबंधित आहे. 'एन्कीच्या राज्यात' पृष्ठ क्रमांक ६-७ वर हा उतारा आहे.

अमेरिकेत शिक्षण घेणाऱ्या प्रमोद वेंगुर्लेकर या विद्यार्थ्यांशी निगडीत असणारा हा उतारा आहे. भारत आणि अमेरिका या दोन्ही देशातील वातावरणात त्यांचे सूर जुळलेले नाहीत. भारतीय समाजात आपल्याला समाधानकारक जगता येत नाही असे प्रमोदला वाटते. अमेरिकन समाज हा आधुनिक असूनही या समाजाशीही त्याचे सूर जुळलेले नाहीत.

'समाज विरूद्ध व्यक्ती' यांच्यातील संघर्ष या उताऱ्यात चितारलेला आहे. देवळात जाणे हा केवळ इथे एक पुसटसा संदर्भ आला आहे. बी. ए. झाल्यावर देवळात न जाणे आणि अमेरिकन लोकांची मोकळी वागणूक या दोन तपशीलांनी भारत व अमेरिका यांच्यातील भौतिक पर्यावरण लक्षात येते.

उताऱ्यातील कथानकाचा विचार करता भौतिक सामाजिक पर्यावरणात आपण उपरे आहोत अशी भावना असणाऱ्या प्रमोद वेंगुर्लेकरला नायकत्व बहाल केलेले आहे. व्यक्ती आणि समाज यांच्यातील नातेसंबंध शोधण्यावर यात भर दिलेला आहे. कादंबरीचे प्रामुख्याने दोन ध्रुव आहेत. स्वत:च्या सामाजिक नातेसंबंधांचा शोध विलास सारंग यांनी 'एन्कीच्या राज्यात' घेतलेला आहे. कधी 'स्व' वर तर कधी 'समाज आणि संस्कृती' वर या दोहोंपैकी एकावर भर दिलेला आहे.

या उताऱ्याचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे यात प्रमोद हे मध्यवर्ती पात्र आहे. कादंबरी तृतीयपुरूषी निवेदनाद्वारे पुढे सरकते. पहिल्या उताऱ्याच्या वाचनानंतर कादंबरीची एकूणच मध्यवर्ती संकल्पना लक्षात येते. यानंतर आणखी एका उताऱ्याचे विश्लेषण आलेले आहे. पहिल्या उताऱ्याचे विश्लेषण करताना ज्या टप्प्यातून जावे लागते आहे त्याच टप्प्यातून दुसऱ्या उताऱ्याचे विश्लेषण केलेले आहे. हा दुसरा उतारा 'एन्कीच्या राज्यात' पृष्ठ क्रमांक ५८ वर आलेला आहे.

बसऱ्याच्या विद्यापीठात शिक्षक म्हणून दाखल झाल्यानंतर प्रमोदच्या आयुष्यात घडणारी घटना येथे आलेली आहे. बसरा हे नकाशावर समुद्रकिनाऱ्यावरील शहर आहे. परंतु प्रमोदला येथे समुद्र किनारा पहायला मिळत नाही. तो थोडा दूर आहे हे कळल्यावर फ्रांस्वा आणि हमीदला बरोबर घेऊन समुद्र

पहायला निघाला आहे. तेथे मिलिटरी कॅम्प आहे. ते निषिद्ध क्षेत्र असल्यामुळे तेथील ऑफिसर प्रमोद व त्याच्या मित्रांना आपल्या जीपमधून समुद्राचे दर्शन घडवितो. समुद्राचा व्यापक विस्तार एका बाजूला आणि इतर लोकांना समुद्रापासून दूर ठेवण्याचा लष्काराचा प्रयत्न यांवर इथे भाष्य आलेले आहे.

वरील सर्व गोष्टींचा विचार करून प्रमोदचा भारत-अमेरिकामार्गे इराकपर्यंत झालेला प्रवास लक्षात येतो. आतापर्यंतच्या दोन उताऱ्यांच्या वाचनात प्रमोद व त्याच्या भोवतालचा समाज यांच्यातील नातेसंबंध शोधण्यावर भर दिलेला आहे, हेच दिसून येते. शैलीदृष्ट्या विचार करताना संपूर्ण उतारा घटनेचे सादरीकरण करणारा आहे. त्यामुळे येथे निवेदकाचे निवेदन येत नाही. त्याऐवजी पात्रांची दृश्य संभाषणे दिसून येतात. 'समुद्राला त्यांनी चक्क कैदेत टाकलंय.' प्रमोदच्या तोंडच्या उद्‌गारातून वास्तववादी वैचारिकता दिसून येते.

आतापर्यंत दोन उताऱ्यातून जे विवेचन आलेले आहे ते प्रमोद व त्याच्याभोवतालीचा समाज या दोन ध्रुवांमधले ताण-तणाव स्पष्ट करणारे आहेत. यानंतरही आणखी उतारा घेतलेला आहे. यातून प्रमोद शिवाय इतर पात्रांचे संदर्भ तसेच आशयसूत्र अधिक व्यापक झालेले आहे. हा उतारा पृष्ठ क्रमांक १०८-१०९ वर आहे.

शाखान हा प्रमोदचा विद्यापीठातील विद्यार्थी आहे. इराकी लोकांनी राजकीय स्वार्थासाठी ज्यांच्यावर अनन्वित अत्याचार केले; त्या शोषित कुद्री जमातीपैकी शाखान हा आहे. यामुळेच भोवतालचे इराकी विद्यार्थी आपल्या विरोधात कटकारस्थाने रचित आहेत असा त्याला संशय येतो. प्रमोदला विश्वासात घेऊन शाखान हे त्याला सांगतो. प्रमोदला मात्र 'पॅरानोइया' ( शाखानला ) जडलेला आहे असे वाटत आहे. 'तुझ्या मानतल्या संशयांना थोडा पॅरानोइयाचा वास येतो आहे.' असे प्रमोदने शाखानला सांगितल्यावर पुढील उतारा म्हणजे शाखानची प्रतिक्रिया आलेली आहे.

पूर्वीच्या दोन उताऱ्यावरून हा तिसरा उतारा थोडा भिन्न आहे. यात आणखी काही पात्रांचा संदर्भ आलेला आहे. आशयसूत्राला आणखी व्यापक बनविणारा उतारा आहे. हा संपूर्ण उतारा म्हणजे शाखानचे इराकी सरकारवरील भाष्य व त्याचबरोबर प्रमोदची प्रतिक्रिया आहे. राजकीय व्यक्ती व सर्वसामान्य जनता यांच्यातील तणाव इथे स्पष्ट झालेला आहे. पहिल्या उताऱ्यातून आलेले व्यक्ती-समाज संबंध इथे व्यापक व्यामिश्र बनलेले आहेत. हा संघर्ष केवळ विशिष्ट भूप्रदेशाशी निगडीत नाही, किंवा सरकारशी संबंधित नाही तर याहूनही तो व्यापक आहे हेच भान या उताऱ्यातून आलेले आहे. यासंदर्भात शाखानच्या भाष्यावरील प्रमोदची प्रतिक्रिया आगळी वेगळी आहे. व्यवस्था आणि व्यक्ती यांच्यातील तीव्र संघर्षाची प्रमोदला झालेली जाणीव ही मानवी संस्कृतीच्या आकलनापर्यंत कादंबरीला घेऊन जाते.

संपूर्ण कादंबरीचा विचार करता या उताऱ्याचे स्थान अनन्यसाधारण आहे. सर्वसामान्य व्यक्तीची अस्मिता एकूणच सर्वंकष संस्कृतीचे भान या दोन्ही ध्रुवांना एकाचवेळी स्पर्श केलेला आहे. यापूर्वी व्यक्ती

किंवा संस्कृती या दोन्ही ध्रुवांपैकी केवळ एकालाच स्पर्श केलेला आहे. दोन्ही ध्रुवांना परस्परांशी असणारा संबंध ही स्पष्ट आलेला आहे. व्यक्ती म्हणून स्वत:ची असलेली ओळख व एकूणच संस्कृतीची जडणघडण हे दोन प्रकल्प प्रमोद समोर उभे केलेले आहेत. शैलीदृष्ट्या विचार करता उतारा संभाषणात्मक स्वरूपाचा आहे.

या उताऱ्याच्या विश्लेषणानंतर 'एन्कीच्या राज्यात' या कादंबरीची आशयसूत्राची व्यामिश्रता अधिक स्पष्ट झालेली आहे. व्यक्ती, तिची एकूणच असणारी जडणघडण आणि त्यासाठी स्वातंत्र्याची असणारी आवश्यकता हा या आशयसूत्राचा पदर आहे. समाज - संस्कृती - व्यवस्था इ. जडण घडण स्पष्ट केलेली आहे. हे सर्व भान या उताऱ्यामधून आलेले आहे. व्यक्तीच्या अस्मितेच्या जडणघडणीसाठी स्वातंत्र्याची आवश्यकता असते व स्वतंत्र व्यवस्थेने नाकारले तर मानवाच्या अस्तित्वासमोर कसे प्रश्न निर्माण होतात याचेच प्रतिपादन आलेले आहे. एकूणच इथपर्यंतच्या विश्लेषणात 'एन्कीच्या राज्यात' काय सांगू पाहते याचा अंदाज येतो.व्यक्ती व समाज दोन्ही भिन्न टोके या उताऱ्यात एकत्र आलेली आहेत.

यानंतर इथे असा एक उतारा आलेला आहे जो आपल्या आशयसूत्राला बळकटी देत आहे. कादंबरीच्या शेवटी प्रमोदने ज्या दोन सफरी केल्या आहेत त्याचे वर्णन आलेले आहे. दुसऱ्या सफरीमधील पृष्ठ क्रमांक १३९-१४० वर हा उतारा आलेला आहे.

प्रमोदन सलवा सोबत केलेला प्रवास वर्णन केलेला आहे. पाणथळीच्या प्रदेशात गेल्यावर प्रमोदचे सलवा सोबतचे संभाषण आणि त्या प्रदेशाबद्दल केलेले भाष्य यात आलेले आहे. 'माती' व 'दगड' यांच्यातील विरोधसंबंध या संभाषणातून स्पष्ट झालेले आहेत. इथे निसर्गातील हे दोनही घटक प्रतीकात्म पद्धतीने आलेले आहेत. माती हे भुसभुसशीतपणा, संदिग्धता, अराजक, स्वातंत्र्याची परिसीमा म्हणून तर दगड कणखरपणा, बंदिस्तता, नियमितपणा यांचे प्रतीक म्हणून वावरत आहे. अराजकसदृध्य परिस्थितीत जगत असतानाही सुरक्षितता मिळावी म्हणून संस्कृतीचा जन्म झाला, सत्ता निर्माण झाली. परंतु मानवी जीवन शक्य होण्यासाठी निर्माण झालेली व्यवस्था कशी फोल ठरली व त्यामुळे मानवी जीवन कसे अशक्य बनले हेच चित्र 'एन्कीच्या राज्यात'आलेले आहे ; तोच आशयसूत्राचा गाभा आहे.

### ३.२.४ टीकाकारांची मते :-

एखादी साहित्यकृती काय सांगू पाहते याचे विश्लेषण झाल्यानंतर आणि एकूणच अर्थनिर्णयन झाल्यानंतर त्या साहित्यकृती विषयी इतर टीकाकारांच्या मतांचा स्वतंत्रपणे परामर्श घेण्याचा विचार मांडलेला आहे. या टीकालेखनाचा उपयोग विश्लेषणाचे एक साधन म्हणूनही करता येतो, तसेच त्यातील उणीवा दूर करून अधिकाधिक परिपूर्ण करता येते.

येथील अभ्यास प्रामुख्याने तुलनात्मक स्वरूपात आहे. दुसऱ्या समीक्षकांचे एकूणच सहित्यकृतीविषयी त्यांनी मांडलेले आकलन अभ्यासक स्वत:च्या आकलनाशी ताडून पाहिले जाते.

आकलनातील भेद हे बहुदा ज्या गोष्टी महत्त्वाच्या वाटल्या त्या दुसऱ्याला न वाटल्यामुळे निर्माण झालेल्या असतात हे दिसून येते. दोन्ही गोष्टीचा विचार करून निर्णय घेतलेले असतात. विशिष्ट गोष्टीवर लक्ष केंद्रित न केल्यामुळे ज्या त्रुटी निर्माण झालेल्या असतात त्यांचा समावेश करून विश्लेषण परिपूर्ण केलेले असते. आकलनातील अर्थनिर्णयातील भेद हे समीक्षकांच्या वैचारिक प्रणालीतून तयार झालेले असतात हे दिसून येते.

एक-दोन परिचयवजा प्रासंगिक टिपणे सोडली तर 'एन्कीच्या राज्यात' वर विशेष असे समीक्षा लेखन झालेले नाही. त्यामुळे इतर समीक्षालेखनाशी स्वत:शी कसे संबंध जोडावेत याचे सादरीकरण झालेले नाही.

### ३.२.५ साहित्यकृतीची अंगे आणि विविध दृष्टिकोण :-

साहित्यकृती 'एन्कीच्या राज्यात' ही कादंबरी काय सांगते हे विश्लेषण प्रारंभीच आलेलेच आहे. यानंतर साहित्यकृतीच्या विविध अंगे यांचा परामर्श घेतलेला आहे. सर्वप्रथम साहित्यकृतीची विविध अंगे ही संकल्पना नेमकेपणाने स्पष्ट केलेली आहे. ती येथे नेहमीपेक्षा वेगळ्या आणि व्यापक अर्थाने घेतलेली आहे. उदा. ज्याने साहित्यकृती निर्माण केलेली आहे तो लेखक साहित्यकृतीचे एक अंग होय. ज्याला उद्देशून ही साहित्यकृती लिहिली आहे तो किंवा तिचे वाचन जो करतो तो वाचक दुसरे अंग होय.

साहित्यकृतीतून लेखकाने निर्माण केलेले जग हे साहित्यकृतीचे तिसरे अंग होय. आपल्याला जे काही सांगायचे आहे त्यातून लेखक एक विशिष्ट रूप साकार करतो ते त्या साहित्यकृतीचे चौथे अंग होय. साहित्यकृती भाषेच्या माध्यमातून साकार होते म्हणून ती भाषा साहित्यकृतीचे पाचवे अंग होय. अशा रितीने साहित्यकृतीचा विविध अंगांचा विचार केलेला आहे.

अभ्यासकाच्या दृष्टिकोणातून तो विविध प्रकार साहित्यकृतीचा अभ्यास करू शकतो हे दिसून येते. एकेका दृष्टिकोणामध्ये विविध पद्धती आढळतात. पद्धतीमागे साहित्याविषयीची विविध गृहितके असल्याची दिसून येतात. पद्धतींच्या उपयोजनात सर्जनशीलत लवचिकता असते. निश्चित भूमिका असते. मात्र कोणताही दृष्टिकोण, अंग, पद्धती स्वीकारताना निवड हा घटक महत्त्वाचा आहे. साहित्यकृतीच्या विविध अंगावर भर दिला की एखाद्या विशिष्ट दृष्टिकोणाला आवाहन केले जाते, या विधानात तथ्य आहे. उदा. लेखक या अंगाचा विचार मांडलेला आहे. पुन्हा एकदा लेखक या अंगाचा विचार करता, चरित्रात्मक दृष्टिकोणाला दुजोरा दिलेला आहे. लेखकाचे चरित्र व कलाकृती यांचेच अन्योन्य संबंध गृहित धरूनच अभ्यास मांडलेला आहे.

लेखकाकडे एक विशिष्ट वर्गाचा प्रतिनिधी म्हणून पाहिलेले आहे. विशिष्ट वर्गाचा संदर्भ लाभल्यामुळेच लेखन साहित्यकृती यांचे जैवसंबंध लक्षात घेऊनच विश्लेषणपूर्वक सिद्ध करण्याचा प्रयत्न

केलेला आहे. या समग्र मांडणीच्या सहाय्यानेच लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण कोणत्या प्रकारची आहे हे स्पष्ट केलेले आहे. हा दृष्टिकोण जरी समाजशास्त्रीय असला तरी त्याचा एकूणच रोख साहित्यकृतीच्या लेखक या अंगाकडे ठेवून साहित्यकृतीचे विश्लेषण केलेले आहे. याचबरोबर मानसशास्त्रीय अंगाचाही वेध घेतला आहे.

साहित्यकृतीची विविध अंगे आणि साहित्यकृतीकडे पाहण्याचे विविध दृष्टिकोण यांच्या संबंधातून किती विविध प्रकारे साहित्यकृतीला सामोरे जाता येते याचे विवेचन केलेले आहे. साहित्यकृतीचा अभ्यास ही संकल्पना किती समृद्ध आहे याचेच विश्लेषण आले आहे. साहित्यकृतीची अंगे व तिच्याकडे पाहण्याचे दृष्टिकोण इ. परामर्श घेतलेला आहे.

## ३.२.६ साहित्यकृतीच्या संरचनेचे विश्लेषण :-

साहित्यकृतीच्या आशयविश्लेषणानंतरचा टप्पा म्हणून संरचना विश्लेषण आलेले आहे. कादंबरीच्या बाबतीत घटना आणि पात्रे यांनी मिळून त्यार झालेली कथा, निवेदन व कृती इ. मधून तयार झालेली संहितेची पातळी यांचे सूक्ष्म विश्लेषण केलेले आहे. साहित्यकृतीच्या संरचनेचे विश्लेषण करण्याची केवळ एकच पद्धती नाही. या संरचनेचा साहित्यप्रकारांचे संदर्भ आहेत. भावकवितेची संरचना व कादंबरीची संरचना भिन्न स्वरूपाची आहे. 'एन्कीच्या राज्यात' चे संरचना विश्लेषण दिलेले आहे.

' एन्कीच्या राज्यात ' ही कादंबरी म्हणजे कथनरूप आहे. कथनरूपाचे विश्लेषण केलेले आहे. कथनरूपाचा लघुत्तम घटक म्हणजे 'घटना'. घटना नेहमी काळामध्ये घडत असते. 'एन्कीच्या राज्यातील' घटनांचा क्रम तयार केलेला आहे. उदा. प्रमोदचे भारतातील आयुष्य, अकिलचा मृत्यू, विविध पात्रांचा भूतकाळ आणि हे सर्व संवाद किंवा चिंतनातून साकारलेले आहे.

घटना आणि पात्रे दोहों मिळून कथनरूपाची एक पातळी तयार झालेली आहे; यातूनच निवेदनाची पातळी निर्माण झाली आहे. 'एन्कीच्या राज्यातील' निवेदक तृतीय पुरूषी सर्वसाक्षी निवेदक आहे. तंत्रदृष्ट्या प्रमोदला धरून ठेवण्याचे कार्य त्याने साधलेले आहे.

कादंबरी काय सांगते आहे यापेक्षा तीमधून येणारी घटनांचा अर्थ समजून घेऊ पाहणारी प्रमोदची ज्ञानप्रक्रिया महत्त्वपूर्ण आहे. 'एन्कीच्या राज्यातील' आशयसूत्र व तिची संरचना यांमध्ये घनिष्ठ संबंध आलेले आहेत.

## ३.२.७. साहित्यकृतीचे मूल्यमापन :-

साहित्यकृतीच्या अभ्यासाचे एक चित्रच येथपर्यंत उभे केलेले आहे. साहित्यकृतीचा अंतिम टप्पा म्हणजे मूल्यमापन मानलेले आहे. मूल्यमापन ही अत्यंत गुंतागुंतीची प्रक्रिया आहे. तिचा अनेक गोष्टींशी असणारा संबंध स्पष्ट केलेला आहे.

निकष आणि मूल्ये यांचा आगळावेगळा विचार मांडलेला आहे. उदा. कादंबरीच्या संदर्भात सौंदर्यमूल्याहून अधिक महत्त्व जीवनमूल्यांना दिलेले आहे. एन्कीच्या राज्यात तिच्यापूर्वी लिहिल्या गेलल्या कांदबरीहून नवे करू पाहणारी मूल्ययुक्त कादंबरी आहे. नवता व प्रयोगशीलता ही मूल्ये व्यापक आहेत. सामाजिक, सांस्कृतिक वातावरणाचा साहित्यकृतीविषयक निकष व मूल्यांवर फार मोठा परिणाम होत असतो. या सर्वांचा विचार करून मूल्यमापन अत्यंत जागरूकतेने करावे हेच विवेचन आलेले आहे.

या प्रकारची काळजी घेतल्यामुळेच 'एन्कीच्या राज्यातील' मूल्यमापन विशेष अर्थपूर्ण सुसंगत, साहित्यकृतीला न्याय देणारे झाले आहे.

## ३.३ लेखकनिष्ठ अभ्यास :-

दलित साहित्याचे भाष्यकार व समकालीन वाङ्मयाचे मिमांसक प्रा. बाळकृष्ण कवठेकर यांनी 'लेखकाचा अभ्यास' मांडलेला आहे. लेखकाचा अभ्यास कसा करावा, याचे मुद्देसूद, सुस्पष्ट व सारगर्भ विवेचन आलेले आहे.

एका लेखकाचा अभ्यास करताना लेखकाला अभ्यासाच्या केंद्रस्थानी ठेवलेले आहे. ''लेखकाच्या जडणघडणीच्या किंवा त्याच्या प्रत्यक्ष लेखनाच्या कालखंडाच्या अभ्यासापेक्षा आणि लेखकाने दावा केलेल्या वाङ्मयप्रकाराचा वाङ्मयप्रकार म्हणून केल्या जाणाऱ्या अभ्यासापेक्षा लेखक आणि त्याचे वाङ्मय यांच्या अन्योन्य संबंधांना, त्यातून झालेल्या इष्टनिष्ट आणि वेगवेगळ्या वाङ्मयीन फलनिष्पत्तीला अभ्यासविषय म्हणून महत्त्व द्यावे लागते.''[३]

एका लेखकाच्या समग्र साहित्याचा चिकित्सक अभ्यास करणे हा विद्यापीठ पातळीवर सर्वमान्य व प्रतिष्ठित वाङ्मयाभ्यासाचा प्रकार आहे. पुढील मुद्द्यांचा विचार करून हा अभ्यास मांडलेला आहे.

### ३.३.१ लेखकाचे जीवन आणि व्यक्तिमत्त्व :-

लेखकाचे जीवन व त्याचे साहित्य, लेखकाचे व्यक्तिमत्त्व आणि साहित्य यांचा जवळचा संबंध आहे. सर्जनशील लेखकाने केलेले ललित वाङ्मय लेखन हे एकापरीने त्याचे आत्मचरित्रच असते. म्हणून लेखकाच्या समग्र साहित्याचा अभ्यास करताना त्या लेखकाच्या जीवनाची माहिती करून घेणे आवश्यक आहे. लेखकाचे बालपण, त्याचं कुटूंब व कौटुंबिक जीवन, त्याच्या नंतरच्या जीवनाची वाटचाल, त्यातील लक्षणीय घटना-प्रसंग यांची माहिती असणे आवश्यक आहे. जीवनाच्या वाटचालीत येणाऱ्या अनेक प्रकारच्या अनुभवांतून लेखकाचे व्यक्तिमत्त्व आकाराला येत असतो, हेच दिसून येते.

जीवनाच्या वाटचालीत येणारे अनुभव, जवळच्या व्यक्तींचा त्याच्यावर पडलेला प्रभाव, त्याची उपजत मन:प्रवृत्ती आणि या सर्वांचा त्याच्यावर होणारा परिणाम यातून लेखकांचे व्यक्तिमत्त्व आकारले जाते. या सर्वच घटकांचा त्याच्या साहित्याचे स्वरूप घडविण्यात सिंहाचा वाटा आहे हेच दिसून येते.

वरील विवेचनाच्या पुष्ठ्यर्थ मराठीतील दोन नामवंत लेखक, एक स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर आणि दुसरे व्यंकटेश माडगूळकर यांचे संदर्भ घेतलेले आहेत. या दोघांचेही व्यक्तिगत जीवन आणि साहित्य यांची माहिती असल्यास सहज लक्षात येते की, त्यांच्या जीवनाचा साहित्याशी निकटचा संदर्भ आहे. त्याच्या जीवनातून त्यांचे साहित्य निर्माण झालेले आहे. उदा. 'सागरास', 'माझे मृत्यूपत्र' इ. सावकरांच्या कविता त्यांच्या जीवनातून निर्माण झालेल्या आहेत. यांचा अभ्यास करताना अभ्यासकांना देशभक्ती, स्वातंत्र्यप्रेम, हौतात्म्याची ओढ हे सर्व विशेष लक्षात घेतले पाहिजेत हेच दिसून येते. उपलब्ध साहित्यातून लेखकाची दिसून येणारी वृत्ती आणि विशिष्ट अनुभवाकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोण इ. विचार येथे मांडलेला आहे.

व्यंकटेश माडगूळकर यांच्या कथा कादंबऱ्यासंदर्भात त्यांच्या व्यक्तिगत जीवनाची माहिती एकूण साहित्य आकलनाला उपयोगी ठरते. 'एका लेखकाचा प्रवास' हे माडगूळकरांचे आत्मकथन वाचल्यानंतर त्यांच्या व्यक्तिगत आयुष्याचा साहित्यावर कसा परिणाम झालेला आहे हेच दिसून येते.

पण चरित्रात्मक समीक्षेच्या काही मर्यादांचे भान अभ्यासकाने ठेवणे कसे हितावह आहे हेही स्पष्ट केलेले आहे. कवीच्या व्यक्तिगत जीवनाच्या अभ्यासातून मिळणारी माहिती कवितेच्या आकलनाला बाधक ठरणारी आहे हेच दिसून येते. उदा. 'प्रेम होईना तुझ्याने - प्रेम माझे राहू दे' ही कविता माधव ज्यूलियन यांनी 'फर्ग्युसन' महाविद्यालयाला उद्देशून लिहिलेली आहे. येथे कवीच्या व्यक्तिगत जीवनाच्या माहितीमुळेच या कवितेच्या आशयाला व अर्थसौंदर्याला मर्यादा पडलेल्या आहेत. अनेकार्थसूचकता या विशेषाला बाधा आलेली आहे. मर्ढेकरांच्या जीवनातील घटना-प्रसंग यांच्या आधारे त्यांच्या कवितांचे आकलन करणे हे कवितांचा अर्थसंकोच करणारे आहे हेच दिसून येते.

एका लेखकाचा अभ्यास करताना त्याच्या जीवनाची तसेच व्यक्तिमत्त्वाची माहिती करून घेणे, एका मर्यादेपर्यंत शक्य आहे. आणि या माहितीचा तारतम्य विवेकानेच उपयोग करणे शक्य आहे, हेच दिसून येते.

### ३.३.२ देश-काल-परिस्थिती :-

एका लेखकाच्या अभ्यास करताना देशकाल परिस्थितीचाही विचार केलेला आहे. ही देशकाल परिस्थिती -

१) लेखकाची व्यक्ती म्हणून जडणघडण काळातील संदर्भ म्हणून आणि

२) लेखक ज्या काळात लिहित असतो त्या संदर्भात अशा दोन संदर्भात विचारात घेतलेली आहे.

प्रत्येक लेखक / कवी एका विशिष्ट पेशात, काळात, समाजात आणि आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक परिस्थितीत जगत आहे. या साऱ्यांशीच त्याचे एक नाते जडलेले असते. यासाठी काही उदाहरणांनी हा

मुद्दा अधिक स्पष्ट केलेला आहे. यादृष्टीने एकोणिसाव्या शतकातील काही ठळक वाङ्मयीन कृती विचारात घेतलेल्या आहेत. या काळातच हरिभाऊ आपटे यांची - 'पण लक्षात कोण घेतो', 'शारदा' हे गोविंद बल्लाळ यांचे नाटक, केशवसुतांच्या सामाजिक सुधारणांचा पुरस्कार करणाऱ्या 'मूर्तिभंजन', 'तुतारी', 'अंत्यजाच्या मूलाचा प्रश्न' इ. कविता, आगरकरांचे निबंध याचकाळात निर्माण झालेले आहेत. याला देश-काल परिस्थितीच कारणीभूत आहे.

बाळशास्त्री जांभेकर - लोकहितवादी न्या. रानडे, म. फुले, आगरकर या सर्वसमाजसुधारकांनी आपल्या विचाराने व कार्याने भारावून टाकले. त्यातूनच महाराष्ट्रातील वैचारिक वातावरण ढवळून निघाले. त्यातूनच वरील साहित्यकृती अस्तित्त्वात आलेल्या आहेत. दलित साहित्याची निर्मिती साठोत्तरी काळातच का झाली? ग्रामीण साहित्यही याच काळात का पुढे आले ? इ.वेध देश-काल परिस्थितीमध्ये घेतलेला आहे.

### ३.३.३ प्रकृतीधर्म :-

१९४० नंतरच्या कालखंडात कुसुमाग्रजांचे काव्य बहारास आले. याचकाळात मर्ढेकर, पु. शि. रेगे यांनीही काव्यनिर्मिती केलेली आहे. या सर्वांच्या काव्याचे स्वरूप पाहता तिघांचे काव्य परस्परांहून भिन्न आहे. कुसुमाग्रजांनी 'क्रांतीचा जयजयकार' करून 'कोलंबसावे गर्वगीत' गायलेले आहे. तर मर्ढेकरांनी 'मी एक मुंगी तू एक मुंगी' अशी जाणीव करून 'जगायची पण आहे सक्ती मरायची पण आहे सक्ती' अशी खंत व्यक्त केलेली आहे. पु. शि. रेंगे यांनी 'रति' भावनेचा आविष्कार केलेला आहे. एकाच काळात लिहूनही तिघांच्याही काव्याचे स्वरूप भिन्न आहे. हे सर्व त्यांच्या 'प्रकृतिधर्मा' मुळे घडून आलले आहे. असे का झाले ? त्या त्या लेखकाच्या प्रकृतीमधील फरक पडल्यामुळेच भिन्न काव्याची निर्मिती झाली.

### ३.३.४ वाङ्मयीन वातावरण :-

लेखकाच्या जडणघडणीच्या काळातील प्रत्यक्ष वाङ्मयीन वातावरणही जाणून घेतलेले आहे. वाङ्मयाच्या इतिहासावर दृष्टीक्षेप टाकता एक गोष्ट सहज लक्षात आलेली आहे की, वेगवेगळ्या काळात शिरून प्रवृत्ती, वाङ्मयप्रकार, विचारप्रवाह, अभिरूची, अभिव्यक्ती एवढ्याच काय तर शब्द, प्रतिमा यांचा प्रभाव आढळून आलेला आहे. नवोदित अनेक रूढ प्रवाहांचे अनुकरण करतात हेच दिसून आलेले आहे. १८८५-१९२० या काळात कादंबरी या वाङ्मयप्रकाराचा फार मोठा प्रभाव इतर वाङ्मयप्रकारावर पडलेला दिसून येतो. जुन्या काळात गडकरी-खांडेकरी शैलीचे झालेले अनुकरण वाङ्मयीन वातावरणाचा लेखकावर पडलेला प्रभावच आहे.

विशिष्ट लेखकांच्या काळातील वाङ्मयीन वातावरणाचा त्या लेखकांना घडविण्यात फार मोठा वाटा असल्याचे दिसून येते. एका लेखकाच्या वाङ्मयीन अभ्यासात आकलनाला उपयुक्त ठरणारा घटक म्हणून वाङ्मयीन वातावरणाचा अभ्यास केलेला आहे.

### ३.३.५ लेखकाने हाताळलेले वाङ्‌मयप्रकार :-

एका लेखकाचा अभ्यास करताना त्याच्या समग्र आकलनासाठी आवश्यक पूर्वतयारी केलेली आहे. त्यानंतर प्रत्यक्ष साहित्याचा विचार मांडलेला आहे. हे सर्व करताना लेखकाने कोणते साहित्यप्रकार हाताळले आहेत याचा विचार केलेला आहे.

एखाद्या लेखकाने केवळ एकच एक वाङ्‌मयप्रकार हाताळलेला असतो. उदा. मराठी नवकथेचे एक शिल्पकार अरविंद गोखले यांनी केवळ कथालेखनच केलेले आहे. काही लेखकांनी वेगवेगळ्या वाङ्‌मयनिर्मितीची सुरूवात करणारे व्यंकटेश माडगूळकर, पु. भा. भावे, गंगाधर गाडगीळ इ. लेखकांनी कांदबरी, नाटक इ. वाङ्‌मयप्रकार हाताळलेले आहेत.कुसुमाग्रजांसारख्या नामवंत कवीने नाट्यलेखन करून नावलौकिक मिळविलेला आहे.

लेखकाच्या प्रकृतिविशेषाशी अधिक जुळणाऱ्या वाङ्‌मयप्रकाराची सविस्तर चर्चा केलेली आहे. वाङ्‌मयप्रकाराच्या अभ्यासानेच लेखकाचे योग्य मूल्यमापन केलेले आहे. माडगूळकरांनी चांगल्या कादंबऱ्या लिहिलेल्या आहेत. 'सती' सारखे लक्षणीय नाटकही लिहिलेले आहे. परंतु त्यांचे खरी ओळख कथालेखक हीच होय. त्याचप्रमाणे मराठी रसिक वाचकांमध्ये बा. भ. बोरकर यांची कवी म्हणूनच प्रतिमा सिद्‌ध झालेली आहे.

### ३.३.६ लेखकाच्या वाङ्‌मयकृतीतून प्रकट होणाऱ्या आशयाचे स्वरूप :-

एका लेखकाचा अभ्यास करताना त्यातून प्रकट होणाऱ्या जीवनचित्रणाचा विचार केलेला आहे. साहित्यातून प्रकट होणाऱ्या 'भावना', 'अनुभव', 'संवेदना' आणि 'विचार' या चतुष्कोनाचा अभ्यास केलेला आहे.

अभ्यासासाठी निवडलेल्या लेखकाने कथात्म स्वरूपाची वाङ्‌मयनिर्मिती केलेली असेल तर त्यातून प्रकट होणाऱ्या जीवनचित्रणाचा आलेख मांडलेला असतो. त्यामध्ये जीवनाचे सखोल, व्यापक व अनेकांगी जीवनदर्शन कसे घडविलेले आहे याचा उलगडा केलेला असतो. कादंबरीतून साकार होणारे अनुभव विश्व विशाल, व्यापक तसेच अनेकांगी जीवनाचे दर्शन घडविणारे असते. अरूण साधू यांच्यासारख्या समकालीन कादंबरीकाराने विविध प्रकाराच्या समाजजीवनाचा, घटकांचा वेध घेतलेला आहे. समकालीन समाजाचा उभा-आडवा वेध त्यांनी घेतलेला आहे. त्यामुळे या कादंबऱ्या वाचनीय आहेत. मराठी कादंबरीला पारंपारिक चौकटीच्या बाहेर नेण्याचे कार्य त्यांच्या कादंबरीने केले आहे. भालचंद्र नेमाडे यांनी महाराष्ट्रीय समाजजीवनाचा शिक्षणक्षेत्राच्या अंगाने छेद घेतलेला आहे. १९५०-१९७५ या कालखंडातील महाराष्ट्रीयन कुटुंबजीवन, समाजजीवन, जातीव्यवस्था, एकूणच समाजाचे अध:पतन इ. वेध घेतलेला आहे.

दलित कादंबरीच्या आधी १९५० मध्ये प्रसिद्ध झालेली विभावरी शिरूरकर यांची 'बळी' कादंबरी तात्कालीन समाजव्यवस्थेतील जीवनाशय प्रकट करते. केतकर, वा. म. जोशी, विभावरी शिरूरकर, श्री. ना. पेंडसे, भालचंद्र नेमाडे, रंगनाथ पाठारे इ. कादंबरीकार मराठी कादंबरीच्या १५० वर्षांच्या वाटचीचे प्रमुख टप्पे आहेत हेच दिसून येते.

**३.३.७ लेखकाचा मूल्यात्म दृष्टिकोण :-**

साहित्यकृतीचा आशय म्हणजे लेखक तिच्यातून प्रकट करू पाहणारा जीवनानुभव असतो. हा जीवनानुभव लेखकाला जसा आला तसा त्याने स्पष्ट केलेला असतो. वाङ्मय निर्मिती करताना या अनुभवांची संगती लावलेली असते, हेच दिसून येते. प्रत्येक लेखकाच्या लेखनातून त्याचा जीवनानुभव प्रकट करणारा दृष्टिकोण दिसून येतो. हा दृष्टिकोण मूल्यांवर आधारित असतो आणि तो मूल्यांनी स्पष्ट केलेला आहे. ही मूल्ये लेखकाच्या जीवनाशी एकरूप झालेली असतात हे दिसून येते. सामाजिक बांधिलकीच्या भूमिकेतून साहित्यनिर्मिती करणाऱ्या लेखकाच्या अभ्यासाच्या संदर्भात मूल्यात्मक दृष्टिकोणाचे अवलोकन केलेले आहे.

**३.३.८ वाङ्मयनिर्मितीची परंपरा आणि नवता :-**

लेखकाच्या वाङ्मयनिर्मितीतील परंपरा आणि नवता शोधण्याचा प्रयत्न केलेला आहे. लेखकांचे लेखन हे प्रामुख्याने दोन प्रकारचे असते. पहिल्या परंपरेतील लेखकांनी पारंपारिक पद्धतीचे लेखन केलले आहे, तर दुसऱ्या प्रकारचे लेखक या परंपरेतील महत्त्वपूर्ण टप्पे म्हणून ओळखले जातात इ. परामर्श घेतलेला आहे. केशवसुत-मर्ढेकर, सुर्वे- ढसाळ हे कवितेच्या संदर्भातील या प्रकारातील साहित्यिक आहेत. तर देवल, खाडिलकर, वरेरकर, तेंडुलकर हे नाट्यप्रांतातील नाटककार याच संदर्भातील आहेत.

**३.३.९ समकालीन व उत्तरकालीन लेखकांवरील प्रभाव :-**

अभ्यासविषय झालेला लेखक कोणत्या श्रेणीतील आहे हे लक्षात येण्यासाठी त्याचा समकालीन व उत्तरकालीन लेखकांवर झालेला प्रभाव विचारात घेतलेला आहे. केशवसुत हे फार मोठे कवी आहेत कारण समकालीन कवींवर त्यांचा प्रभाव पडला एवढेच नव्हे तर त्यांच्यानंतरही अनेक पिढ्यांवरही त्यांचा प्रभाव पडलेला आहे. आणि हे प्रभावित झालेले कवीही असामान्य आहेत. गोविंदाग्रज आणि बालकवी यांपैकीच एक आहेत. मोठ्या लेखकांनी परंपरा निर्माण केलेल्या आहेत. थोर लेखक युगप्रवर्तक आहेत. म्हणून एका लेखकाच्या अभ्यासात वाङ्मयाच्या प्रभावाचाही विचार केलेला आहे.

**३.३.१० वाङ्मयेतिहासातील लेखकाचे स्थान :-**

अभ्यासविषय झालेल्या लेखकाचे वाङ्मयेतिहासातील स्थान निश्चित करणे हा मूल्यमापनाचा एक भाग आलेला आहे. वाङ्मयात घातलेली गुणात्मक समृद्धी, परंपरेला प्राप्त करून दिलेली नवीनता,

अनुभवविषयाची व्याप्ती, आविष्कारातील अमुलाग्र क्रांती, विशाल जीवन जाणीवा इ. आधारे लेखकाची श्रेणी निश्चित केलेली आहे आणि याच आधारे लेखकाचे वाङ्मयेतिहासातील स्थान निश्चित केलले आहे.

वरील सर्व विवेचनातून अभ्यासविषय झालेल्या लेखकाची स्थाननिश्चिती करण्यात येते हे दिसून येते. अभ्यासाठी निवडलेल्या लेखकाने वाङ्मयीन - सामाजिक - सांस्कृतिक वाङ्मयनिर्मिती केलेली असते. या लेखकाने विविध वाङ्मयप्रकारात वाङ्मय निर्मिती केलेली असते. त्या भाषेच्या वाङ्मयीन संस्कृतीवर लेखकाचा ठसा उमटलेला असतो.

## ३.४ साहित्यप्रकारनिष्ठ अभ्यास :-

इंग्रजीचे अभ्यासक असूनही मराठी साहित्याचे आस्थेने संगोपन, संवर्धन करणारे डॉ. मिलिंद मालशे यांच्या 'साहित्यप्रकारांचा अभ्यास' हा लेख आहे. 'साहित्यप्रकारांचा अभ्यास' असा विषय घेतला तर अभ्यासकाच्या डोळ्यासमोर काय येते ? या प्रश्नानेच विषयाची सुरूवात झालेली आहे. लघुकथा, कादंबरी, कविता, नाटक, महाकाव्य, शोकत्मिका, सुखात्मिका इ. वेगळ्या-वेगळ्या साहित्यप्रकारांची वैशिष्ट्ये सांगणारे लेखन डोळ्यासमोर येते. एकूणच ''साहित्यप्रकार म्हणजे काय?'' या प्रश्नाची तात्त्विक चर्चा केलेली आहे. साहित्यप्रकार ही समीक्षेतील महत्त्वपूर्ण संकल्पना असली तरी देखील तिचा तात्त्विक विचार मराठी समीक्षेमध्ये फारसा झालेला नाही, हेच दिसून येते.

साहित्यप्रकारचा तात्त्विक विचार वर्गीकरणाच्या आधारे मांडलेला आहे. हा वर्गीकरणाचा सिद्धांत म्हणजे काय ? ते का करायचे इ. अनुषंगाने चर्चा केलेली आहे. वर्गीकरण म्हणजे काय ? ते का करायचे? कलेची निर्मिती तसेच कलानुभवात वर्गीकरणाचे स्थान काय ? साहित्य प्रकार म्हणजे काय ? त्यांच्या वर्गीकरणाची तत्त्वे कोणती ? ही तत्त्वे किती प्रमाणात सार्वत्रिक आहेत ? इ. सैद्धांतिक समस्यांची चर्चा केलेली आहे.

संस्कृत काव्यशास्त्रात काव्यप्रकारांची चर्चा दण्डी, भामह, वामन यांनी केलेली आहे. भरताच्या नाट्यशास्त्रामध्ये नाट्यप्रकारांचा परामर्श घेतलेला आहे. परंतु वर्गीकरणाचे सैद्धांतिक विवेचन यांमध्ये पुरेसे झालेले नाही. प्राचीन भारतीय साहित्यशास्त्रांमध्ये साहित्यप्रकाराचे विवेचन हे अगदी जुजबी आलेले आहे. साहित्यप्रकारांची सैद्धांतिक मांडणी करणाऱ्या मूलभूत संकल्पनांची इथे चर्चा केलेली आहे. साहित्याच्या सर्जनप्रक्रियेत आणि ग्रहणप्रक्रियेत मानवी मनाचा जो व्यापार घडलेला आहे, त्याच्या स्वरूपाची चर्चा केलेली आहे.

पाश्चात्य साहित्यशास्त्राच्या अभ्यासात चार टप्पे दाखविलले आहेत. ॲरिस्टॉटलच्या मांडणीच्या पहिल्या टप्प्याचा विचार केलेला आहे. या चौकटीत अनेक वर्षे साहित्यप्रकारांचा अभ्यास झालेला आहे. याचा उल्लेख अभिजातवाद आणि नव-अभिजातवाद असा केलेला आहे.

दुसऱ्या टप्प्यात इमॅन्युयल कांट यांच्या सौंदर्यशास्त्रीय स्वच्छंदतावादी सिद्धतेमधून पहिल्या परंपरेला छेद देणारी तत्त्वे उद्भवलेली आहेत.

तिसरा टप्पा रूपवादी सिद्धांताचा ; विसाव्या शतकाच्या प्रारंभी काळात या सिद्धांताचा प्रभाव होता हेच दिसून येते.

चौथ्या टप्प्यामध्ये १९५० नंतरच्या समीक्षेचा विचार झालेला आहे. यामध्ये विविध प्रकारच्या समीक्षाप्रवाहांमधून प्रकारनिष्ठ समीक्षेला वाव मिळालेला आहे. तसेच वर्गीकरणाच्या सिद्धांतालाही चालना मिळालेली आहे.

शिकागो क्रिटीक्स या नावाने ओळखल्या जाणाऱ्या आर. एस. क्रेन, एन्डर ओल्सन या अमेरिकन समीक्षांनी क्रिटिक्स ॲन्ड क्रिटीजन : एन्शंट ॲन्ड मांर्डन या ग्रंथामध्ये ॲरिस्टॉटलच्या तत्त्वांची पुनर्मांडणी केलेली आहे.

नॉथन फ्रॉय या कॅनेडिअन समीक्षकाने 'Anatomy of Criticism ( 1957)' या ग्रंथामध्ये साहित्यप्रकारांची गुंतागुंतीची व्यवस्था समजून घेतलेली आहे. १९७० नंतर संरचना .वाद चिन्हमीमांसा इ.सहाय्याने 'जोनाथन कलर', 'रॉबर्ट शोल्झ', 'तोदोरोव्ल' इ.समीक्षकांनी साहित्यप्रकारांची चर्चा केलेली आहे.

वर उल्लेखलेल्या चार टप्प्यांचा सविस्तर परामर्श घेतलेला आहे. सैद्धांतिक आणि उपयोजनात्मक अशा दोन्ही पातळ्यांवर साहित्यप्रकारांचा अभ्यास कसा होऊ शकतो याचेच विवेचन दिलेले आहे.

### ३.४.१ ॲरिस्टॉटल -

**कलांचे वर्गीकरण :-**

ॲरिस्टॉटलने कलेची व्याख्या करून सर्व कलांमध्ये जे समान सत्त्व दिसून येतात त्यांचा विचार केलेला आहे. यासाठी ॲरिस्टॉटलने 'अनुकरण' या तत्त्वाचे प्रतिपादन करून कला या अनुकरणाचाच एक प्रकार आहे असे मानलेले आहे. या कलांमध्ये महाकाव्य, शोकात्मिका, सुखात्मिका एवढेच नव्हे तर वृंदगायनासाठी वापरले जाणारे डिथिरॅंबिक काव्य, तसेच बासरी व लायर या वाद्यांचे वादन इ. कलांमध्ये समाविष्ट झालेली आहेत. कला ही अनुकरणात्मक असली तरी तिचे भेद-उपभेद निर्माण झालेले आहेत. अनुकरणाचे माध्यम व साधन, अनुकरणाचे लक्ष्य, अनुकरणाचे प्रस्तुतीकरण या ३ निकषांच्या आधारे कलाप्रकारांचे सैद्धांतिक वर्गीकरण केलेले आहे.

अनुकरणाचे माध्यम एक तर अवकाशात्मक रूप व रंग किंवा ध्वनी असे मानले गेलेले आहे. अवकाशात्मक रूप व रंग या माध्यमातून अनुकरण घडून चित्रकला अस्तित्वात येते. ध्वनी माध्यमांचे अनुकरण करणाऱ्या बऱ्याच कला आहेत. ध्वनी माध्यमाची इ. उपमाध्यमे ॲरिस्टॉटलने वेगळी काढलेली आहेत. यामध्ये लय, भाषा, सुरावट इ. समावेश झालेला आहे. वाङ्मय या कलेमध्ये भाषा हे उपमाध्यम

स्वतंत्रपणे येते. वाद्यसंगीतात लय व सुरावट ही उपमाध्यमे एकत्रित येतात तर प्रयोगनिष्ठ कलांमध्ये लय, भाषा, सुरावट ही तिन्ही उपमाध्यमे एकत्र येतात. शोकात्मिका-सुखात्मिका इ. साहित्यप्रकार यांमध्ये समाविष्ट होतात हेच दिसून येते.

अनुकरणाचे लक्ष्य म्हणजे मानव व त्याच्या कृती हेच असते हे दिसून येते. ॲरिस्टॉटलचे वर्गीकरणाचे हे तत्त्व नैतिकतेशी निगडीत आहे. याचा संबंध सद्‌गुण व दुर्गुणाशी निगडीत मानलेला आहे. सर्वच प्रकारच्या कलांमधून मानवाच्या सर्व प्रकारांचे तसेच कृतींचे अनुकरण झालले आहे. उदा. चित्रकलेमध्ये मध्यम मानवाचे चित्रण केले गेलेले आहे. पॉसन यांच्या चित्रांमधून अधम मानवाचे चिंतन केले गेलेले आहे. वाङ्‌मयामध्ये होमरच्या व्यक्तिरेखांमध्ये उत्तम मानवाचे चित्रण केलेले आहे.

या वर्गीकरणाचा तिसरा निकष म्हणजे अनुकरणाचे प्रस्तुतीकरण आहे. यात प्रस्तुतीकरण करणारी व्यक्ती स्वत:च्या आवाजात निवेदन करत असताना केवळ पात्रांच्या सहाय्याने प्रस्तुतीकरण करते; यातूनच नाट्य निर्माण झालेले आहे. ॲरिस्टॉटलच्या वर्गीकरणाचे काही महत्त्वपूर्ण विशेष येथे दिलले आहेत.

१) भावकला हा साहित्यप्रकार ग्रीक काव्याने मानला नसला तरी ॲरिस्टॉटलने त्याचा उल्लेख केलेला नाही.

२) ॲरिस्टॉटलने प्रामुख्याने एपिक, ट्रॅजिडी आणि कॉमेडी असे ३ साहित्यप्रकार चर्चिलेले आहेत.

३) शोकात्मिका व सुखात्मिका यांचा विचार ॲरिस्टॉटलने नाट्यप्रकार म्हणून केलेला आहे.

४) सुखात्मिकेला एक विशेष अर्थ प्राप्त करून दिलेला आहे. इ. विशेषांचा येथे परामर्श घेतलेला आहे.

### ३.४.२ सुखात्मिका :-

ॲरिस्टॉटलने साहित्यप्रकारांविषयी सिद्धांतांचा जो ऐतिहासिक विकास केलेला आहे. त्याचाच मार्मिक परामर्श घेतलेला आहे. ॲरिस्टॉटलने काव्यशास्त्राच्या दुसऱ्या विभागात सुखात्मिकतेविषयी जो दुसरा भाग लिहिलेला आहे तो पुरेसा स्पष्ट झालेला नाही. तो काळाच्या ओघात नष्ट झालेला आहे की, तो केवळ लिहिण्याची पूर्वतयारी म्हणून ठेवलेला होता हे स्पष्ट झालेले नाही.

'अधम व्यक्तिरेखांचे अनुकरण करणारा प्रकार म्हणजे सुखात्मिका' अशी व्याख्या केलेली आहे. सुखात्मिकतेमध्ये हास्यकारण घटनाशय येतो. शोकात्मिकेतील घटनांमुळे करूणा, भिती या भावनांचे उद्‌दीपन होते. तर सुखात्मिकेमधून सुख आणि हास्य या भावनांचे उद्‌दीपन होते हेच दिसून येते.

### ३.४.३ वर्गीकरणाला आव्हान :-

### १) कांट

एकोणिसाव्या शतकामध्ये स्वच्छंदतावादी सिद्धांताने ॲरिस्टॉटलच्या साहित्यप्रकारांच्या चौकटीवर व तिच्या प्रभावातून निर्माण झालेल्या नव-अभिजातवादी परंपरेवर मोठा प्रहार केलेला आहे. आधुनिक सौंदर्यशास्त्रामध्ये कांटचे स्थान अनन्यसाधारण आहे. आधुनिक सौंदर्यशास्त्रामध्ये कांटप्रणीत परंपरेचा प्रभाव आहे. कांटचे सौंदर्यात्मक व ज्ञानात्मक अनुभवामध्ये भेद केलेला आहे. ॲरिस्टॉटलप्रणीत सिद्धांतामध्ये हा मूलभूत भेद मानला गेलेला नाही. सौंदर्याच्या क्षेत्रामध्ये संकल्पनांना स्थान न देणारा सौंदर्यसिद्धांत पुढीलप्रमाणे मांडलेला आहे.

अ) सौंदर्यविधान हे संकल्पनांवर आधारलेले नसते तर आनंदाच्या भावनेवर आधारलेले असते.

ब) सुंदर वस्तूंच्या अनुभवांमध्ये एक प्रकारची संगती असते व ती भावते. केवळ सौंदर्याचा अनुभव संकल्पना विरहीत मानलेला आहे; त्यामुळे सुंदरवस्तू ही अनन्यसाधारण असते.

एकोणिसाव्या शतकामध्ये स्वच्छंदतावादी भूमिकेमध्ये कांटच्या सौंदर्य सिद्धांताला अनन्यसाधारण स्थान आहे. कांटने सौंदर्यानुभव हा ज्ञानानुभवापेक्षा वेगळा मानलेला आहे. त्यामुळे सौंदर्य व कला यांची वेगळी स्वायत्त तत्त्वे मानणे सोपे झालेले आहे. अभिजातवाद व त्या नंतरचा नवअभिजातवाद या सिद्धांतामध्ये शोकात्म नाटक आणि एपिक या साहित्यप्रकारांना आदर्श मानणाऱ्या भूमिकेचा स्वच्छंदतावाद्यांनी त्याग करून भावकाव्याला प्राधान्य दिले. कांटच्या याच भूमिकेचे विवचेन आलेले आहे.

### २. क्रोचे :-

विसाव्या शतकाच्या सुरूवातीला 'क्रोंचे' या इटालिअन सौंदर्यशास्त्राने प्रतिभ ज्ञान व तार्किक ज्ञान असा भेद केलेला आहे. सौंदर्य व कला या दोन्ही प्रकारांचा तार्किक पातळीवर विचार झालेला आहे. प्रतिभ ज्ञानाच्या पातळीवर तर संकल्पना व वर्गीकरण, निकष यांचे स्थानच नाकारलेले आहे.

कांट व क्रोचे या दोघांच्या भुमिकेने साहित्यप्रकारांचा वर्गीकरणाचा आव्हान दिलेले आहे.

### ३. रूपवाद व त्यासमोरील आव्हाने -

**रशियन रूपवाद :-** रशियन रूपवाद ही चळवळी रशियामध्ये १९१५-१६ मध्ये सुरू झाली होती, हे दिसून येते. या चळवळीतील काही घटक कांटच्या प्रभावाखाली होते. प्रत्येक कलाकृती स्वतंत्र-स्वायत्त आहे हेच त्यांचे विचार होते. परंतु याचबरोबर त्यांना फ्युचरिस्ट चळवळीमधील कलात्मक नाविन्य आणि प्रयोगशीलता यांचेदेखील आकर्षण होते, हेच दिसून येते. रूपवादासमोर हे एक प्रभावी आव्हान होते. नावीन्य आणि प्रयोग यांचा विचार करताना साहित्यप्रकारांचा संदर्भ घेणे आवश्यक आहे. एकूणच रशियन रूपाचे हा कांटप्रणीत तत्त्वे आणि प्रकारनिष्ठ समीक्षा यांचे अवघडलेले मिश्रण आहे.

कथा, नाटक आणि काव्य या तीनही साहित्यप्रकारामध्ये रूढ चौकट तसेच संकेतिकता मोडून काही नाविन्य निर्माण झालेले आहे, हेच दिसून येते. अशा प्रकारचा प्रयत्न मर्ढेकर यांनी आपल्या 'रात्रीचा दिवस' या कादंबरीमध्ये केलेला आहे. परंतु समीक्षकांच्या मते हेच नाविन्य वसंत कानेटकर यांच्या 'घर' मध्ये जाणवते. विजय तेंडुलकर यांनी रूढ चौकट मोडण्याचा हाच प्रभावी प्रयत्न 'घाशीराम कोतवाल' मध्ये केलेला आहे.

एकूणच रशियन रूपवादामध्ये एक प्रकारची द्वंद्वंता निर्माण झालेली आहे. या द्वंद्वात्मक अभ्यासात साहित्यप्रकारांच्या संकल्पनेला पायाभूत स्वरूपाचे स्थान प्राप्त झालेले आहे.

**बख्तिन :-** रशियन रूपवादाचा त्याग न करता रूपवादी विश्लेषण पद्धतीला सामाजिक व सांस्कृतिक विचारांची जोड देण्याचे कार्य बख्तिन याने केलेले आहे. रशियन रूपवादामध्ये जी द्वंद्वता निर्माण झालेली आहे. ती बख्तिनमुळेच ! बख्तिनने - साहित्यप्रकार ही दुय्यम व्यवस्था मानलेली आहे तर भाषेच्या उपयोजनासंदर्भात 'संभाषणप्रकार' व्यवस्थेला महत्त्व दिलेले आहे.

एकूणच रशियन रूपवादाला सामाजिक-सांस्कृतिक आशयतत्त्वाची जोड देण्याचे कार्य बख्तिन याने केलेले आहे. साहित्यप्रकारांना मार्क्सवादी आशयतत्त्वाचे संदर्भ देण्याचे कार्यही त्याने साधलेले आहे हेच दिसून येते. याचबरोबर सोरस्युरच्या भाषिक संरचनेचाही त्याने पुरस्कार केलेला आहे.

**ॲग्लो-अमेरिकन रूपवाद :-** ॲग्लो-अमेरिकन, समीक्षेच्या परंपरेतील हा रूपवाद नवसमीक्षेच्या स्वरूपात पुढे आलेला आहे. टी. ए. एलियट आणि रिचर्डस यांच्या प्रभावातून हा रूपवादी प्रवाह निर्माण झालेला आहे. काव्याचे श्रेष्ठत्व सिद्ध करताना एलियट रूपवादाच्याही पुढे गेल्याचे दिसून येते तर रिचर्डस काव्यातील भावनात्मकतेचा विचार रूपवादाच्या विरोधी मांडत आहे ; हेच दिसून येते.

## ४) चिन्हमीमांसा आणि संरचनावाद :-

चिन्हमीमांसा आणि संरचनावाद या आधुनिक संकल्पनांमध्ये 'ज्ञान' या संकल्पनांचा पाया बराच व्यापक केलेला आहे. ज्ञानसंकल्पनेच्या सहाय्याने 'साहित्यिक क्षमता' व्यापक करण्याचा प्रयत्न केलेला आहे. याच अनुषंगाने साहित्यप्रकारांची व्यवस्था लावणाऱ्या निकषांचा व्यापक विचार मांडलेला आहे. फेर्दिना दि सोरस्यूर या आधुनिक भाषावैज्ञानिकाने भाषिक व्यवस्था आणि भाषिक वर्तन यांची चर्चा केलेली आहे. त्याचप्रमाणे नोम चॉम्स्की याने 'भाषिक क्षमते'ची चर्चा केलेली आहे.

## ५) भावकाव्याचा करार :-

भावकाव्याच्या करारशर्तींचा विचार केलेला आहे. या करारामध्ये आत्मपरता व भावनिकता, मुख्यार्थबाध व प्रतिकात्मता, नादसन्मुखता व दृश्यसन्मुखता, मिताक्षरत्त्व, अंतर्गत सुसंगती व सेंद्रियता, ही मूलभूत तत्त्वे म्हणजे करारशर्तींचा विचार मांडलेला आहे.

ऐतिहासिकदृष्ट्या कराराची संकल्पना ही येथे सामाजिक स्वरूपाची मानली गेलेली आहे. साहित्यिक क्षमता म्हणजे पायाभूत साहित्यिक कराराच्या लवचिक स्वरूपाचे, त्यातील अनुस्युत मूल्यांची, नावीन्याच्या बदल होणाऱ्या शक्यतांची संकल्पना उलगडून दाखविलेली आहे.

### ३.५ वाङ्मयाच्या कालखंडाचा अभ्यास :-

वाङ्मयतेहिसाचे तत्त्वचिंतक, भारतीय भाषासाहित्याचे तुलनाकार तसेच भाषा-साहित्य-संस्कृती इ. वेध घेणारे समीक्षक द. दि. पुंडे यांनी या लेखात 'वाङ्मयाच्या कालखंडाचा अभ्यास' याचा परामर्श घेतलेला आहे. एकूणच अभ्यासाचा प्रारंभ 'कालखंड' या संज्ञेच्या विचाराने झालेला आहे.

#### ३.५.१ काल आणि कालखंड :-

विषय शीर्षकातील 'कालखंड' या संज्ञेचा विचार मांडलेला आहे. 'काल' आणि 'कालखंड' ह्या संज्ञा तत्त्वज्ञान, ज्योतिषशास्त्र, खगोलशास्त्रांतर्गत गणित, इतिहास इ. निरनिराळ्या अभ्यासामध्ये वापरली गेलेली आहे. यातील प्रत्येक ठिकाणी तिचा अर्थ व धर्म वेगवेगळा आलेला आहे. तत्त्वज्ञानामध्ये काल ही संज्ञा 'शाश्वती' या अर्थाचे आलेली आहे. तर शास्त्रामध्ये ही संज्ञा 'महाकाव्य' आणि 'खंडकाव्य' अशा भेदांच्या अर्थाने वापरली गेलेली आहे. इतिहासशास्त्रात ही संज्ञा 'गणक' म्हणून वापरलेली आहे. वाङ्मयाच्या अभ्यासामध्ये ही संज्ञा वाङ्मयतेहासाशी निगडीत आहे.

#### ३.५.२ कालखंड मानण्याची गमके :-

निसर्गनिर्मित किंवा मानवनिर्मित एका घटनेपासून दुसऱ्या घटनेपर्यंतचा कालप्रवाह म्हणजे कालखंड होय. कालगणना शास्त्रामुळे 'कालखंडाच्या' विस्तार संकोचाचे अचूक मोजमाप घेणे शक्य झालेले आहे. याचेच विवेचन येथे आलेले आहे. कालखंड ही संकल्पना जितकी नैसर्गिक आहे किंबहुना तेवढीच तार्किक, कृत्रिम आणि हेतूसापेक्ष आहे. वाङ्मयेतिहासामध्ये कालखंड कसे मानावेत याचेच दीर्घ विवेचन येथे केलेले आहे. वाङ्मयाच्या इतिहासातील 'कालखंड' मानण्याची गमके निश्चित करण्याची जबाबदारी वाङ्मयेतिहासकारांवर कशी आहे याचेच स्पष्टीकरण केलेले आहे.

"एका विशिष्ट भाषेतील आरंभकाळापासून विद्यमान काळापर्यंतच्या समग्र वाङ्मयीनकृतींचा व वाङ्मयीन घडामोडीचा एक वाङ्मयसंबंध विशिष्ट दृष्टिकोण घेऊन केलेला परंपराधिष्ठित ऐतिहासिक अभ्यास म्हणजे वाङ्मयेतिहास।" (पृष्ठ १३०)

अशी स्थूल व्याख्या केलेली आहे. वाङ्मयेतिहास ही वाङ्मयाचा अभ्यास करण्याची स्थूल पद्धती आहे. यामध्ये वाङ्मय निर्मितीच्या प्रेरणा, प्रवृत्ती, प्रभाव परिणामांची स्थूल संगती लावली आहे. एका विशिष्ट मानवसमूहाचा वाङ्मयीन आविष्कार कालक्रमानुसार वाङ्मयेतिहासात विचारात घेतलेला आहे.

वाङ्मयेतिहासाच्या कोणत्याही स्वरूपाचा प्रकार असला तरी त्यासाठी वाङ्मयप्रवाहाचे विशिष्ट कालखंड मानावेच लागतात. कालखंड एका विशिष्ट कालखंडाचा अभ्यास या संज्ञा वाङ्मयअभ्यासात रूढ झालेल्या आहेत. राजकीय, सामाजिक इतिहासांच्या प्रभावामुळेच सर्वच भाषांमध्ये असे कालखंड निर्माण झाले आहेत. उदा. यादवकालीन मराठी वाङ्मय. काही वाङ्मयेतिहासात स्वत:चा खास प्रभाव निर्माण करणाऱ्या व्यक्तींच्या नावांवरूनही कालखंड कल्पिले आहेत. उदा. 'शेक्सपिअरन एज' किंवा 'चिपळूणकर पर्व'. असे कालखंड प्रामुख्याने लेखकनिष्ठ वाङ्मयेतिहास लेखनामध्ये निर्माण झालेले आहेत हेच प्रामुख्याने दिसून येतात. उदा. मराठीमध्ये डॉ. अ. ना. देशपांडे यांनी आपल्या वाङ्मयेतिहास लेखनात असा प्रकार रूढ केलेला आहे. वाङ्मयाच्या प्रवाहात एखादा लेखक त्या विशिष्ट वाङ्मयीन कालखंडात आपल्या कार्यकर्तृत्त्वाने बहरास आलेला असतो आणि एकूणच त्या कालखंडावर त्याचा प्रभाव पडलेला आहे हेच दिसून येते. त्याला हे श्रेष्ठत्व बहाल होते ते कारण म्हणजे त्याच्या बरोबरीच्या लेखकांची अल्पस्वल्प कामगिरी होय. छोट्या मोठ्या लेखकांनी केलेल्या प्रयत्नामुळे एका संचित युगकर्त्या लेखकाच्या नावाभोवती कालखंड निर्माण झालेला दिसून येतो. मूळातच वाङ्मयाच्या प्रवाहात एकट्या लेखकाचा एका विवक्षित कालखंडावर प्रभाव दिसून येतो हेच मुळी प्रश्नचकित होणारे आहे हे दिसून येते. म्हणूनच लेखकावरून कालखंड मानू नये हेच दिसून येते आणि हाच पक्ष पुढे मान्यही केला गेल्याचे दिसून येते. या विधानाच्या पुष्ठ्यर्थ पुढे काही महत्त्वपूर्ण विवेचन दिलेले आहे. लेखकावरून कालखंड मानू नये यासाठी पुढेही अनेक कारणे दिलेली आहेत.

१) एखाद्या लेखकाचे कर्तृत्व कितीही उत्तुंग असो तरीही त्या कालखंडाचे संपूर्ण महत्त्वमापन करता येत नाही. कारण या लेखकाने स्पर्शही न केलेल्या अनेक घटना या कालखंडामध्ये घडून गेलेल्या असतात, हेच या विवेचनातून स्पष्ट झालेले आहे.

२) याहूनच. एक प्रमुख कारण उदाहरणासहित दिलेले आहे. एखाद्या युगपुरूष वाटणाऱ्या लेखकाचे कर्तृत्व युगप्रवर्तक राहत नाही.

उदा. परिवर्तनवादी विचाराचे सूत्र केंद्रभागी मानले तर चिपळूणकर बाजूला होतात आणि संपूर्ण झोत म. फुले यांच्याकडे वळतो आणि म्हणून 'चिपळूणकर पर्व' कसे फोल ठरते याचेच दिशा दिग्दर्शन दिसून येते. म्हणूनच व्यक्तीला केंद्रस्थानी ठेऊन वाङ्मयीन कालखंड मानणे धोक्याचे आहे हेच दिसून येते.

कोणताही इतिहास हा अखेर स्थित्यंतराचा इतिहास आहे आणि वाङ्मयेतिहास त्याला अपवाद नाही. या वाङ्मयेतिहासातून स्थित्यंतराचा वेध घेतला गेलेला आहे. एखादी वाङ्मयीन परंपरा स्थित होत असतानाच नवता अस्तित्त्वात आलेली आहे असेही दिसून येते. यातूनच परंपरा आणि नवता यांच्यातील संघर्ष विकोपाला गेल्याचे दिसून येते. परंपरेने कधी-कधी क्षीण होऊन नवतेला जागा दिलेली आहे.

उदय, विकास व ऱ्हास या त्रिसूत्रीने कालखंड निश्चित केलेला आहे. वाङ्मयीन वातावरणाचा उदय, विकास व ऱ्हास दर्शविणारा कालखंड वाङ्मयाच्या अभ्यासाचा कालखंड झालेला आहे. उदय, विकास व ऱ्हासाचे हे सूत्र अधिक स्पष्ट केलेले असतेच असे नाही कारण बऱ्याचवेळा ते अस्पष्टही राहिलेले आहे. याचे प्रमुख कारण म्हणून काही वाङ्मयीन परंपरा, वाङ्मयीन कृती किंवा वाङ्मयरूपे ऱ्हास होत असतानाचा नवीन परंपरा, वृत्ती निर्माण झालेल्या आहेत हे स्पष्ट होते. ही सर्व वाङ्मयीन घटिते एकाच वेळेस या उदय, विकास, ऱ्हास या चक्रातून गेलेली आहेत. उदा. मराठी वाङ्मयेतिहास कादंबरी हा रूपविशेष सिद्ध होण्याअगोदर तो केवळ लघुकथा म्हणूनच रूढ झालेला आहे. सर्वच लेखक मंडळी काही नवे वेगळे पण बहुतांशी समान असेच जीवनभान आजही मांडत आहेत, हेच दिसून येते.

### ३.५.३ अभ्यासाच्या अटी :-

कालखंड कसे निश्चित करावेत यानंतर या वाङ्मयाचा अभ्यास कसा करावा याचाच विचार स्पष्ट झालेला आहे. कालखंडाच्या अभ्यासाची अटी व पथ्ये यांचे सारांशाने निर्देश केलेले आहेत.

यथायोग्य संशोधन ही कालखंडाच्या अभ्यासाची पूर्वअट मानलेली आहे. परंतु संशोधन आणि कालखंडांचा अभ्यास या दोन्ही गोष्टी पूर्णत: भिन्न आहेत हेच स्पष्ट केलेले आहे. संशोधन ही स्वतंत्र व स्वयंपूर्ण विद्याशाखा मानली गेलेली आहे. वाङ्मयाच्या अभ्यासात हे संशोधन मात्र उपकारकच आहे याची येथे प्रचिती येते.

राजकीय, सामाजिक, वैचारिक घटनांतून घडणारी वाङ्मयनिर्मिती व एकूणच वाङ्मय व्यापार यांवर परिणाम झालेला आहे. त्यामुळे या सर्व घटितांचा अभ्यास कालखंडाच्या अभ्यासासाठी आवश्यक आहे याचेच प्रतिपादन केलेले आहे.

कालखंडाचा अभ्यास आणि समीक्षा यांची गल्लत कशी होते याचेही विवेचन केलेले आहे. कालखंडाच्या अभ्यासामध्ये लेखकाचा, लेखनकृतींचा किंवा विशिष्ट वाङ्मयीन वातावरणाचा परंपरा निरपेक्ष किंवा वाङ्मयप्रवाह निरपेक्ष अभ्यास संभवत नाही. समीक्षेत मात्र अशाच स्वरूपाच्या अभ्यासाचा समावेश आहे. याची दक्षता अभ्यासकाने घ्यावी. कारण कालखंडाच्या अभ्यासात वाङ्मयीन स्थित्यंतरे, वाङ्मयीन परंपरा व नवता इ. वेध घेतलेला आहे, तसेच हा समग्र अभ्यास येथे मांडलेला आहे.

कालखंडाच्या अभ्यासाच्या संदर्भात आणखी एक गोष्ट अधोरेखित केलेली आहे. विशिष्ट कालखंडात वाङ्मयनिर्मितीची व एकूण वाङ्मयव्यापाराची काही विशिष्ट केंद्रे कार्यरत झालेली आहे. कालखंड बदलला की ही केंद्रेही बदलली गेलेली आहेत. मराठी वाङ्मयाच्या प्रवाहाकडे सहज नजर टाकली तरी हे स्पष्ट झालले आहे. उदा. पैठण, ऋद्धिपूर ही केंद्रे आरंभकाळात कार्यरत होती. तर आधुनिक वाङ्मयाच्या कालखंडात मुंबई-पुणे कार्यरत आहेत हे दिसून येते. अलिकडच्या कालखंडात ही केंद्रे औरंगाबाद, श्रीरामपूर, नागपूर इ. ठिकाणी विखुरलेली आहेत.

अगदी अलीकडच्या कालखंडात अभ्यासासाठी आणखी एक उपयुक्त पद्धती अस्तित्त्वात आलेली आहे. ती म्हणजे कालपट तयार करण्याची पद्धती होय. प्रा. गो. न. कुलकर्णी यांनी १९२०-१९२७ या कालखंडातील सांस्कृतिक, राजकिय, सामाजिक, कलाक्षेत्रातील घटनांचे वैविध्यपूर्ण तपशील देणारा एक कालपट तयार केलेला आहे. याचेच निरीक्षण प्रारंभीच्या विश्लेषणातून दिसून येते. कालपट ही वाङ्मयीन वातावरणाचा अभ्यास करण्याची अस्सल सामग्री आहे हे गो. म. कुलकर्णी यांनी दाखवून दिलले आहे. अलीकडे 'भारतीय साहित्याचा इतिहास' सिद्ध करण्याची कल्पना पुढे आलेली आहे. साहित्य अकादमीने असा प्रकल्पही हाती घेतलेला आहे. 'भारतीय वाङ्मयाचा इतिहास' लिहिण्यासाठी कोणती सूत्रे स्वीकारायची इ. प्रश्नांचाही विचार केलेला आहे.

### ३.५.४ एक प्रश्न :-

एका महत्त्वपूर्ण प्रश्नाची चर्चा केलेली आहे. तो म्हणजे - 'वाङ्मयेतिहासातील कालखंडाचा अभ्यास' व 'विवक्षित कालखंडाचा वाङ्मयीन अभ्यास'. ह्या दोन वेगवेगळ्या गोष्टी आहेत का ? याचा विचार केलेला आहे.

एक विशिष्ट कालखंड हा समग्र वाङ्मयेतिहासाचा एक भाग आहे. अगोदरच्या आणि नंतरच्या खंडाशीही तो निगडीत आहे; हेच स्पष्ट होते. विशिष्ट कालखंडातील वाङ्मय व्यापाराचे अगोदरच्या व नंतरच्या कालखंडातील वाङ्मय व्यापाराशी त्याचे नाते स्पष्ट करावे लागते हेच दिसून येते.

याउलट विवक्षित कालखंडात विशेष अभ्यास करताना त्या कालखंडातील वाङ्मयाचे पूर्वोत्तर काळातील अनुसंधान दाखविले जात नाही तर त्या विवक्षित कालखंडातील एकूण वाङ्मयाचे स्वरूप वर्णनात्मक पद्धतीने निवेदन केलेले असते, हेच दिसून येते. म्हणूनच 'कालखंडाचा अभ्यास' आणि 'विवक्षित कालखंडाचा अभ्यास' या एकूणच वेगवेगळ्या गोष्टी आहेत.

### ३.५.५ अभ्यासाचे महत्त्व :-

एकूणच कालखंडाच्या अभ्यासाचे महत्त्व स्पष्ट केलले आहेत. कालखंडाच्या वाङ्मयाधिष्ठित अभ्यास झालेला असेल त्यामुळे एखाद्या वाङ्मयकृतीचे, लेखकाचे किंवा वाङ्मयीन घटनेचे आकलन साकल्याने करता येते हे साधार स्पष्ट केलेले आहे. मोरोपंतांची व्यासंगी प्रवृत्ती, किर्तन प्रवचन परंपरा वाङ्मयीन कालखंडाच्या पटावर खुलून दिसते आहे. महर्षी कर्वे यांची स्त्री-शिक्षणविचार प्रणाली दृढ झालेली आहे. प्रवाहाच्या विरोधात पोहणारा प्रवाहातच भिजलेला असतो. म्हणूनच वाङ्मयाभ्यासाच्या पूर्णतेसाठी 'कालखंडाचा अभ्यास' अत्यावश्यक आहे हेच साधार मांडलेले आहे.

### ३.६ प्रबंध लेखन रीत :-

कवी, कथाकार, समीक्षक आणि भारतीय भाषा साहित्याचे अभ्यासक अशा विविधांगी कार्यकर्तृत्वाने मराठी वाङ्मयावर ठसा उमटविणारे डॉ. सुधाकर देशपांडे यांचा 'प्रबंधलेखन रीती' हा लेख गौरवग्रंथात आलेला आहे.

एम.ए., एम. फिल., पीएच.डी., डी.लिट इ. पदव्यांसाठी संशोधन हे अत्यावश्यक तसेच वैशिष्ट्यपूर्ण असते. काही ठिकाणी एम्. ए. परीक्षेसाठी देखील संशोधनाची प्रश्नपत्रिका आहे. एम्. फिल. साठी दीर्घ निबंध अभिप्रेत आहे तर पीएच. डी. साठी व्यापक विषयावरील संशोधन आवश्यक आहे. डी. लिट. पदवीचा प्रबंध सादर करताना उच्चतम कोटीचे संशोधन सादर करावे लागते. तेथे मार्गदर्शनाची गरज उरलेली नसते. येथे संशोधनाचा पूर्वानुभव गाठीला असतो. संशोधनकर्ता तितकाच तोलामोलाचा असतो.

संशोधनपर लेखन, मग ते कोणत्याही श्रेणीचे असो त्या लेखनात सुसूत्र, शिस्तबद्ध, तर्कनिष्ठ व सुसंगत लेखन अपेक्षित आहे. लेख ( आर्टीकल ), निबंध ( एसे ), शोध निबंध ( रिसर्च पेपर ), दीर्घ निबंध ( डिझरटेशन ), प्रबंध ( थिसेस ) व ग्रंथ ( ट्रिटाइज ) या संशोधनातील महत्त्वपूर्ण संकल्पना आहेत. या संकल्पना तसेच एकूणच प्रबंधलेखन रीती स्पष्ट केलेली आहे.

#### ३.६.१ संशोधन म्हणजे काय ?

'प्रबंधलेखन रीती' चा अभ्यास करताना सर्वप्रथम संशोधन म्हणजे काय ? या संकल्पनेचा सर्वप्रथम विचार केलेला आहे. इंग्रजीत 'रिसर्च', हिंदीत 'अनुसंधान' या संज्ञा संशोधन या अर्थाने वापरल्या जात आहेत. संशोधन हे सर्वगामी आहे, प्रत्येक शाखेनुसार त्याचे स्वरूप बदलते आहे. संशोधन ही एक प्रक्रिया आहे. बौद्धिक सामर्थ्याचा उपयोग करून संशोधनात तथ्यसंकलन केले जाते. संशोधन हा शास्त्रीय स्वरूपातील तथ्यसंकलनाचा प्रयत्न आहे.

संशोधन या संस्कृत शब्दाचा अर्थ रूढार्थाहून खूपच वेगळा आहे. सं + शुद्ध म्हणजे संपूर्णत: शुद्ध करणे. दोष काढून चुकीची दुरूस्ती करणे, तर अर्वाचीन काळात 'शोध घेणे', 'नवे उपलब्ध करून घेणे' असा घेतला आहे.

#### ३.६.२ संशोधनाची शास्त्रीय पद्धती :-

सर्व ज्ञानशाखांतील संशोधनात वस्तुनिष्ठ, विमर्शक विचार पद्धती, तर्कशुद्धता, या विवेचनास जे आधार आहेत त्यांचे नोंदीकरण याला फार महत्त्व आहे, हेच स्पष्ट केलले आहे. विविध ज्ञानशाखात गरजांनुसार संशोधन प्रक्रिया विकसित झालेल्या आहेत.

१) **वैज्ञानिक संशोधन** - हे संशोधन प्रयोगशाळेत केले जाते.

२) **समाजशास्त्रीय संशोधन** - विविध क्षेत्रात हे संशोधन केले जाते.

३) **वाङ्‌मयीन संशोधन** - हे ग्रंथकेंद्रित संशोधन वाङ्‌मय क्षेत्रात प्राधान्याने होते.

इ. संशोधन प्रकारांचे साधार विवेचन केलेले आहे.

संशोधनाच्या शास्त्रीय पद्‌धतीचे प्रमुख टप्पे पुढीलप्रमाणे दिलेले आहेत.

१) काळजीपूर्वक अवलोकन

२) अवलोकनातील निरीक्षणांची नोंद

३) वर्गीकरण

४) अभ्युपगम

५) पुन:परीक्षण

६) निष्कर्ष

वाङ्‌मयीन संशोधनातही शास्त्रीय पद्‌धतीचाच वापर केला जातो, असे स्पष्ट केले आहे.

### ३.६.३ अभ्युपगमाचे महत्त्व :-

अभ्युपगम किंवा गृहितकृत्य पडताळून पाहवे लागते तसेच ते सिद्‌ध करावे लागते हेच येथें दिसून येते. ''संशोधक म्हणजे मारून मुटकून तर्कविधाने लढवून अशिलाची बाजू घेणारा वकील नव्हे, तर्कबुद्‌धी जागृत ठेवून सत्यान्वेषण करणाऱ्या न्यायाधीशाची वृत्ती त्याच्या अंगी बाणावयास हवी. ज्या क्षणी आपण गृहीत धरलेली भूमिका विकणारी नाही असे जाणवेल, त्या क्षणी ती सोडून देऊन पर्यायी भूमिकेचा पाठपुरावा करण्याची त्याची सिद्‌धता असली पाहिजे.'' पृष्ठ १४६

अभ्युपगम हा एक प्रस्थानबिंदू आहे. यासंदर्भात काही अभ्युपगम साधार दिलेले आहेत. उदा.

१) पंडिती कवितेचे खरे प्रतिनिधी मोरोपंतच.

२) विष्णूशास्त्री चिपळूणकर यांनी मराठी वाङ्‌मयात नवयुगप्रवर्तन केले.

३) मराठी कथेचा मानदंड म्हणजे जी. ए. कुलकर्णींची कथा इ. गृहितके इथे आलेली आहेत.

### ३.६.४ साहित्य संशोधन :-

साहित्य संशोधन हे मानव्य विज्ञानावर संशोधनचाच एक भाग आहे असे स्पष्ट होते. साहित्य संशोधनात कलाकृतीतील सौंदर्यरूपाचा शोध घेतला जातो. जीवनार्थ कोणता व तो सौंदर्यरूपाची कशी प्रतीती देतो याचाच शोध घेतला जातो, हे दिसूनयेते. रचनाबंध किंवा अनुभवाचा घाट हेच ललित वाङ्‌मयाचे असाधारण वैशिष्ट्य आहे. प्रा. दिगंबर पाध्ये यांनी लेखनातून व्यक्त होणारी जीवनदृष्टी, वाङ्‌मयात दिसून येणारी वैचारिकता इ. वाङ्‌मयीन संशोधनाचे विषय मानलेले आहेत.

वाङ्मय ही एक असाधारण कला असली तरी साहित्यनिर्मिती अतार्किक आहे. साहित्याचा अभ्यास हा शास्त्रीय चौकटीत मांडलेला आहे. मराठी वाङ्मयाचा अभ्यास नानाविध दृष्टिकोणातून केला जातो हेच दिसून येते.

**३.६.५ साहित्यसंशोधनाचे प्रकार :-**

साहित्य संशोधनाचे प्रमुख दोन प्रकार मानलेले आहेत.

१) लोकांना अज्ञात असणारा एखादा ग्रंथ किंवा संहिता प्रथमच प्रकाशात आणणे.

२) उपलब्ध ग्रंथातील आविष्काराचा, आशयाचा नवा अन्वयार्थ लावणे. उदा.

डॉ. रा. शं. वाळिंबे यांनी ज्ञानेश्वरीकडे विदग्ध रसवृत्तीचा विलास या दृष्टिकोणातून प्रबंध सादर केलेला आहे.

डॉ. वि. भि. कोलते यांनी महानुभाव संप्रदायातील संहिता सर्वप्रथम संपादित करून प्रथमत: प्रकाशात आणल्या हे पहिल्या प्रकारचे संशोधन होय. प्राचीन व अर्वाचीन साहित्याचे संशोधन (१) ग्रंथ, (२) ग्रंथकार, (३) ग्रंथकाल या घटकांच्या अनुषंगाने कसे करता येते हे येथे साधार मांडलेले आहे.

१) **ग्रंथाचे संशोधन** - ग्रंथाचा आकार, पृष्ठसंख्या / ओव्या, श्लोक, ग्रंथातील विषय, त्यातील तत्त्वज्ञान, व्यक्तिरेखा, एकूणच आकृतीबंध याप्रकारे संशोधन होऊ शकते, हेच दिसून येते.

२) **ग्रंथकाल केंद्रित संशोधन** :- ग्रंथकाराचे जीवनचरित्र, त्याचा जीवनविषयक दृष्टिकोण, व्यक्तिमत्त्वाची जडण-घडण, त्याच्या लेखनामागील प्रेरणा व प्रवृत्ती इ. लेखकाभ्यासाची दिशा मिळते.

३) **ग्रंथकालाचे संशोधन** :- तो विशिष्ट काळ, या कालखंडातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, आर्थिक परिस्थिती इ. शोध घेतला जातो, हेच स्पष्ट केले गेले आहे.

रूढ वाङ्मयीन संशोधनाचे स्वरूप पुढीलप्रमाणे रेखाटलेले आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | विशिष्ट वाङ्मयप्रकार | २) | विशिष्ट ग्रंथकार |
| ३) | विशिष्ट कालखंड | ४) | विशिष्ट धर्मसंप्रदाय |
| ५) | विशिष्ट विचारप्रणाली | ६) | विशिष्ट वाङ्मयीन वृत्ती |

* रंगभूमीचा इतिहास, नियतकालिकांचा अभ्यास हाही करता येईल.

* भाषांतरिक साहित्याचे मूल्यमापन करण्याचे प्रयत्न यशस्वी झालेले आहेत. उदा. रवींद्रनाथ टागोर, प्रेमचंद इ.

* लोकवाङ्मय, दलित वाङ्मय यांचेही संशोधन प्रकल्प हाती घेतलेले आहेत.

### ३.६.६ विषयाची निवड :-

अभ्यास विषयाची निवड करताना कोणत्या घटकांना प्राधान्या द्यावे याचे विवेचन दिलेले आहे. अभ्यासकाचे कुतूहल जागे करणारा व त्याला गोडी वाटेल असा विषय त्याने निवडावा हेच येथे स्पष्ट केलेले आहे. विषय निवडीचे स्वातंत्र्य अभ्यासकाला आहे. येथे सक्ती नाही. ज्या विद्यापीठात प्रबंधलेखनासाठी नाव नोंदविले आहे त्या विद्यापीठात त्याचवेळी अन्य कोणी त्या विषयांवर संशोधन करीत नाही ना याचा विचार येथे महत्त्वाचा आहे. विद्यापीठे ज्या विषयांवर संशोधन चालू आहे त्यांची यादी पुरवतात. त्याआधारे खात्री करून विषय निश्चित करावा. विषयाचे ओझे वाटता कामा नये. विषयांच्या कक्षा विस्तारत जातात त्या संकुचित होत नाहीत हेच साधार मांडलेले आहे. ज्ञानेश्वरी, तुकाराम अभंगगाथा, आधुनिक मराठी कवितेतील शिवराय प्रतिमा, मर्ढेकरांचे साहित्य असे संकुचित विषय घेऊन विषयाला न्याय देता येत नाही; हेच स्पष्ट केले आहे.

''प्रबंध लेखनात अनेकदा विविध ललितकृतींचा परामर्श घ्यावा लागतो. निबंधाचे प्रतिपाद्य कवितेची मध्यवर्ती कल्पना, कादंबरीचा सारांश, कथेतील स्वभावलेखन, नाटकाची कथावस्तू, चरित्रकाराची भाषाशैली अशा ढोबळ मुद्यांना धरून हा परामर्श उरकून चालणार नाही. अशा अभ्यासाला अन्य अनुषंगिक क्षेत्राचे ज्ञान असणे आवश्यक आहे. त्याशिवाय त्या ललितकृतींतून व्यक्त झालेल्या जीवनानुभवाची उंची, खोली व व्यापकता विशद होणे कठीण आहे.''[४]

विद्यार्थ्याने मार्गदर्शक निवडतानाही आपल्या आपल्या आवडीचा विषय व मार्गदर्शकाचे अभ्यासाचे क्षेत्र मिळते जुळते आहे का ? हे ही पहावे लागते. साधनसामग्रीची उपलब्धता हा ही भाग विषय निवडताना लक्षात घ्यावे लागते याचा विचार मांडलेला आहे. सुसज्ज ग्रंथालय ही अशावेळी अत्यावश्यक बाब आहे.

विषय सुटसुटीत असावा. 'रविकिरण मंडळाचे काव्य' असा विषय घेण्यापेक्षा 'यशवंतरावांची कविता' किंवा माधव ज्यूलियन यांचे काव्य असा मर्यादित विषय घेणे आवश्यक आहे ; हे साधार स्पष्ट केलेले आहे. अरूण कोल्हटकर, ग्रेस यांची कविता नवख्या अभ्यासकाच चक्रावून टाकील. त्याने ना. धों. महानोर, नारायण सुर्वे, शंकर वैद्य, रमेश तेंडुलकर, शांता शेळके इ. कवींचा अभ्यास करणे सोयीचे वाटते. प्रत्येक विषयाची सीमा नीट आखून घ्यावी लागते. एकदा विषय निवडला की, नंतर वाचनास प्रारंभ करावा, हेच विवेचन आलेले आहे.

### ३.६.७ वाचन केव्हा व कसे करावे :-

एकदा अभ्यास विषय निश्चित केल्यानंतर त्यासंबंधी इतर कोणी जे लिहिलेले आहे ते वाचत बसू नये. सर्व प्रथम निखळ मनाने आपण त्या साहित्यकृतीचे वाचन करावे; हेच स्पष्ट केलेले आहे.

वाङ्मयप्रकारातील सर्व कृतींचे बारकाईने निरीक्षण करावे. आपल्या उत्स्फुर्त प्रतिक्रिया कागदावर नोंदवून ठेवाव्यात हेच साधार मांडलेले आहे.

यासाठी येथे 'विष्णूशास्त्री चिपळूणकर यांच्या निबंधाचा अभ्यास' याचे उदाहरण घेतलेले आहे. हा प्रबंध विषय निवडल्यानंतर चिपळूणकरांचे 'शालापत्रका'तील निबंध, तसेच 'निबंधमाले'तील निबंध तसेच केसरीमधील निबंध यांचाच विचार केलेला आहे. प्रारंभी हे निबंध, निखळ मनाने वाचून जागोजाग अभिप्राय, प्रतिक्रिया नोंदवाव्यात. यानंतर इतर मान्यवर जसे की, श्री. ना. बानहट्टी, ग. त्र्यं. माडेखालकर, न. र. फाटक यांच्या मतांचा चिकित्सक विचार केलेला आहे.

यानंतर सुसज्ज ग्रंथालय पाहून तेथील संदर्भ ग्रंथांचा उपयोग करून घ्यावा असा विचार मांडलेला आहे. आवश्यकतेनुससार वृत्तपत्रांचे संच, संबंधित संस्थांची तसेच शासकीय इतिवृत्ते, इतर संदर्भग्रंथ, ग्रंथसूची, ग्रंथकारसूची चाळून त्यांच्या नोंदी घेणे आवश्यक आहे. यासाठी ग्रंथालयातील तालिका पाहणे आवश्यक आहे. ग्रंथालयातील तालिका, आनुपूर्वी ( alphabetical order) यांची माहिती करून घेणे आवश्यक आहे.

मराठी ग्रंथसूची ( शं. ग. दाते ) व मराठी नियतकालिकांची सूची ( शं. ग. दाते - व. दि. काळे, शं. ना. बर्वे ) या दोन सूची हाताशी असणे आवश्यक आहे. कारण यामुळे १५० वर्षातील समृद्ध वाङ्मय आपल्यापुढे उभे राहते. वाचनाबरोबरच 'निरीक्षणे', 'मुलाखती' इ. संशोधन तंत्रांचा अवलंब करणे आवश्यक आहे. इ. विवेचन येथे आलेले आहे.

### ३.६.८ टिपणांसाठी पुद्ठिकांचा उपयोग :-

टिपणे काढण्यासाठी पुद्ठिका वापरणे योग्य आहे. पुद्ठिका जाड, टिकाऊ, क्रम पुढे मागे करण्यास सोयीच्या असाव्यात. पुद्ठिकांना क्रमांक द्योत. पुद्ठिका प्रामुख्याने तीन प्रकारच्या तयार केलेल्या असतात.

१) ग्रंथनोंद । साधनसूची साठी ( आधार २'' × ५'')

२) संदर्भग्रंथांची टिपणे, अवतरणे यासाठी ( आकार ४'' × ६'' )

३) स्वत:चे स्वतंत्र विवेचन ( आकार ८'' × ११'' )

या सर्वांसाठी अस्सल साधनांवर भर देणे आवश्यक आहे.

### अवतरणांचे प्रयोजन व उपयोजन :-

मूळ प्रबंधामध्ये अवतरणांचा किती आणि कसा उपयोग करावा याचे विवेचन आलेले आहे. मजकूराच्या एका दशांशापेक्षा अधिक भाग अवतरणांनी व्यापू नये. केवळ विद्वत्तेच्या प्रदर्शनासाठी अवतरणे देणे म्हणजे प्रबंधलेखन हे कातरकाम व जोडकाम आहे असे वाटते.

संशोधनपर प्रबंधातून अभ्यासकाचा दृष्टिकोण हेच महत्त्वाचे असते. इतरांची मते ही केवळ अभ्यासकाच्या मताला पूरक म्हणून किंवा समर्थनार्थ म्हणून आलेले असतात, हेच दिसून येते.

### ३.६.९ तळटीपांचा उद्‌देश व पद्‌धत :-

तळटीपा या आधारासाठी घेतलेल्या साधनांचा उल्लेख करण्यासाठी असतात. ज्या ज्ञानसाधनांचा वापर करून आपण संदर्भ घेतलेला आहे हेच नोंदविलेले असते. एखाद्या साधनाचा आपण घेतलेला विश्वसनीय मागोवा तळटीपा सिद्‌ध करतात हेच दिसून येते.

प्रबंधातील सर्व तळटीपा एकाच प्रकारे लिहिलेल्या असतात. संशोधन पद्‌धती तंत्राचा एक महत्त्वपूर्ण भाग म्हणून तळटीपा उपयोगी आहेत हेच दिसून येते.

### ३.६.१० संदर्भाचे तंत्र :-

आधार साधनांचा उल्लेख करताना हे संदर्भ कसे द्यावेत याचेच दिग्दर्शन येथे केलेले आहे. हे संदर्भ देताना कोणता क्रम ठेवावा लागतो याचेच विवेचन येथे आलेले आहे.

१) अगोदर अद्याक्षरे, मग ग्रंथकाराचे आडनाव, पुढे स्वल्पविराम.

उदा. लेखक ज्या नावाने सर्वज्ञात आहे त्याचाच उल्लेख करावा. जसे अनंत काणेकर, गंगाधर गाडगीळ, मा. ना. आचार्य.

२) ग्रंथनाम अधोरेखित करावे, पुढे स्वल्पविराम.

३) संपा/ भाषां./ रूपां. इ. निर्देश (१) प्रमाणेच करावा लागतो.

४) आवृत्तीचा उल्लेख.

५) प्रसिद्‌धी स्थल.

अशाच स्वरूपात 'नियतकालिकातील लेखातील संदर्भ', 'ग्रंथालयीन हस्तलिखितांचे संदर्भ', 'इंग्रजी ग्रंथांचे संदर्भ' इ. संदर्भ द्यावेत हेच येथे दिसून येते.

### ३.६.११ तत्रैव आणि उनि यांची योजना :-

एकच संदर्भ लागोपाठ आला तर तळटीपेत 'तत्रैव' ( म्हणजे तेथेच ) ही संज्ञा वापरली जाते. यानंतर इतर साधनांचे संदर्भ दिले जातात व पुन्हा एकदा पूर्वोक्त साधनाचा संदर्भ देताना ग्रंथकाराचे नाव देऊन 'उनि' ( उपरनिर्दिष्ट ) हा संक्षेप वापरला जातो व त्यासोबत पृष्ठ क्रमांक ही लिहिला जातो हेच येथे दिसून येते.

### ३.६.१२ प्रबंधाची विभागणी :-

सर्व तांत्रिक बाजू सांभाळून संशोधन पूर्ण झाल्यानंतर प्रबंधाच्या अंतिम मांडणीचे विवेचन येथे आलेले आहे.

१) मुखपृष्ठ

२) प्रास्ताविक ( शक्य तितके संक्षिप्त )

  १) विषयाची निवड व प्रयोजन

  २) नवीन सिद्धांत

  ३) विषय रूपरेखा

  ४) ऋणनिर्देश

३) विषयानुक्रमिका

प्रबंधातील सर्व प्रकरणे, त्यातील पोटमथळे तसेच पृष्ठकांची नोंद करावी लागते.

४) प्रकरण १ ( उपोद्घतात )

५) ग्रंथाचा गाभा

६) उपसंहार

७) परिशिष्टे

८) संदर्भसूची

९) दर्शिका

प्रबंधाचा असा वैशिष्ट्यपूर्ण आराखडा येथे दिलेला आहे. डॉ. हे. वि. इनामदारांनी यात जी लक्षणीय भर घातलेली आहे याचेही विवेचन येथे आलेले आहे. त्यांच्या मते - प्रत्येक प्रकरणाच्या आरंभ - ''प्रस्तुत प्रकरणात पुढील मुद्यांचा क्रमशः परामर्श घ्यावयाचा आहे.'' अशा स्वरूपाचे प्रास्ताविक करून त्या मुद्यांचे मथळे १, २, ३, ४, ५ अशा क्रमाने द्यावेत.

प्रबंधाचे पहिले प्रकरण विषय प्रवेशाच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. हेतू - व्याप्ती - मर्यादा यांचे विश्लेषण येथे आलेले असते.

**प्रबंधाची शैली :-**

प्रबंधाच्या शैलीचे सारे - गुणविशेष वर्णन केलेले आहेत. प्रबंधाची शैली अनलंकृत, रोखठोक आणि नेमकेपणा, अचूकपणा यांचे महत्त्व जाणणारी असावी. अकारण डौल, वितंडवाद, उपहास व उपरोध करणारी दुर्बोध शैली नसावी हेच स्पष्ट झालेले आहे.

**समारोप :-**

अभ्यासकाने प्रबंधलेखन विद्या सचोटीचे कशी आत्मसात करावी, याचाच राजमार्ग येथे स्पष्ट केलेला आहे. मग पीएच.डी. ही केवळ शोभेची अक्षरे उरणार नाहीत, हेच स्पष्ट झालेले आहे.

## ४ रत्नाकर बापूराव मंचरकर यांचे समीक्षालेखन :-

जुन्या आणि नव्या साहित्याची सारखीच जाण व त्यामध्ये रस घेणाऱ्या सौ. वैशाली श्रीकृष्ण भालसिंग या मंचरकर सरांच्या कन्या आहेत. 'रत्नाकार बापूराव मंचरकर यांचे समीक्षालेखन'[५] या लेखातून त्यांनी मंचरकर सरांच्या एकूणच समीक्षालेखनाचा आढावा घेतलेला आहे. मंचरकर सरांची समीक्षा ही तीन तपाहून अधिक लिहिलेली आहे. ती विपुल, विविध आणि कसदार आहे याचेच दर्शन या लेखातून दिसून येते. मंचरकर यांचा सर्वात पहिला दखलपात्र समीक्षा लेख म्हणून ( साहित्यमीमांसापर) 'अलंकार - संज्ञा इतिहास आणि अर्थ' हा 'नवभारत' मध्ये मार्च १९६८ मध्ये प्रसिद्ध झाला.

र. बा.मंचरकर यांनी समीक्षेच्या विविध क्षेत्रांमध्ये नेमकी कोणती भर घातली हेच येथे दिसून येते. त्यांच्या समीक्षालेखनाचे सामग्रीने, संकलित स्वरूपात दर्शन घडविणे हेच या लेखाचे प्रमुख उद्दिष्ट्य आहे. त्यांच्या समीक्षालेखनाची वर्गीकृतसूची येथे दिलेली आहे.

### ४.१ संतसाहित्य -

**ज्ञानेश्वरी अध्यायांची साक्षेपी संपादने :-**

ज्ञानेश्वरी अध्याय पहिला, दुसरा, सातवा यांची साक्षेपी संपादने डॉ. र. बा. मंचरकर यांनी केलेली आहेत. ज्ञानदेवांवर मराठीत प्रचंड लेखन झालेले आहे. तरीही त्यांच्याविषयीची सर्व माहिती थोडक्यात एकत्र कोठेच भेटत नाही. हे लक्षात घेऊनच जिज्ञांसूसाठी प्रत्येक अध्यायाला ३३ पासून ९६ पृष्ठांपर्यंत प्रस्तावना दिलेल्या आहेत. ज्ञानदेवांचा काळ, त्यांचा जीवनक्रम, लेखन आणि त्याचे एकूणच वाङ्मयीन कर्तृत्वाचा व त्याविषयीच्या मत-मतांतराचा परामर्श घेतलेला आहे.

ज्ञानेश्वरीचा आकृतीबंध लक्षात घेऊन तिच्यातील सौंदर्यस्त्रोताचे दिग्दर्शन केलेले आहे. द. ग. गोडसे यांच्या आक्षेपांचाही त्यांनी परामर्श घेतलेला आहे. ज्ञानेश्वरीतील एकूण तत्त्वज्ञानाची त्यांनी चर्चा केलेली आहे.

### ४.१.१ ज्ञानेश्वरीतील तत्त्वविचार :-

श्री ज्ञानदेवांच्या एकूणच तत्त्वविचाराचा अभिनव पद्धतीने र. बा. मंचरकर यांनी शोध घेतलेला आहे. एकूणच तिहेरी अंगाचा वेध घेऊन स्त्रोत, स्वरूप व परिणाम यांची चर्चा केलेली आहे. ज्ञानदेवांच्या तत्त्वज्ञानातील 'अद्वैत' तत्त्वव्यूहावर त्यांनी भाष्य केलेले आहे. ऱ्हासकाळातही मराठी जीवनाला नवजीवन देणारी कोणती संजीवनी या तत्त्वज्ञानात होती याचाच वेध मंचरकरांनी घेतलेला आहे.

ज्ञानेश्वरीतील कर्मयोग, ज्ञानयोग आणि भक्तियोग यांची रूपरेषा स्पष्ट केलेली आहे. ज्ञानेश्वरांच्या 'चिद्विलासवादाचा' त्यांनी सांक्षेपाने परामर्श घेतलेला आहे.

### ४.१.२ नामदेवांच्या कवितेतील नवता :-

संत नामदेवांवर मंचरकरांनी नेमकेपणाने लिहिलेले आहे. नामदेव हे मराठीच्या आदिकाळातील कवी आहेत. त्यांच्या कथाकाव्याच्या 'देशी' घाटाचे वेगळेपण मंचरकरांनी स्पष्ट केलेले आहे. त्यांच्या भक्तीकाव्यातील वेगळेपणच त्यांनी मांडलेले आहे. पूर्वपरंपरेच्या पार्श्वभूमीवर नामदेवांच्या काळातील 'नवतेचे' स्वरूप उलगडून दाखविलेले आहे.

### ४.१.३ एकनाथांचा तौलानिक अभ्यास :-

एकनाथ हे प्रतिज्ञानदेव आहेत अशीच मंचरकरांनी मांडणी केलेली आहे. एकनाथ व ज्ञानदेव यांच्यातील कालिक अंतरांची जाणीव लक्षात घेऊन त्यांनी एकनाथ अभ्यास मांडलेला आहे. ज्ञानेश्वर व एकनाथ दोघांचे चरित्र, ज्ञानेश्वरी व एकनाथी भागवत, रामोपासनेचा पुरस्कार, युगप्रवर्तनातील सहभाग इ. ची तौलानिक चिकित्सा केलेली आहे. इतिहासदत्त काम तडीस नेणारे एकनाथ युगधुरंधर संत होते याचीच मांडणी र. बा. मंचरकर यांनी साधार केलेली आहे.

एकनाथ आणि मुक्तेश्वर यांच्यातील अंतरक्रियेचा सूत्ररूप तौलानिक अभ्यासही मंचरकरांनी केलेला आहे. दोन्ही कवींचे चरित्र, त्यांचे लेखन आणि एकूणच वाङ्मयीन कर्तृत्व, अध्यात्मिक बैठक, प्रेरणा प्रवृत्ती त्यांच्यातील साम्यभेदाचा अभ्यास मंचरकरांनी मांडला आहे.

परिशिष्टात दोघांचा संक्षिप्त चरित्रपट, वाङ्मयीन कर्तृत्व इ. परामर्श घेतलेला आहे.

### ४.१.४ संतसाहित्याच्या समीक्षेची समीक्षा :-

संतवाङ्मयाच्या अभ्यासाचे सूक्ष्म अवलोकन र. बा. मंचरकरांनी सविस्तर केलेले आहे. संत साहित्याची कारणमीमांसा जितकी मोठ्या प्रमाणात झालेली आहे, तेवढ्या स्वरूपात त्याची स्वरूपमीमांसा झालेली नाही. या दृष्टिकोणातून संत साहित्याच्या समीक्षेचा त्यांनी आढावा घेतलेला आहे. इतिहासाच्या पटावर संदर्भ बदलत जाऊन संत समीक्षा कसकशी बदलत गेली याचाच विचार मंचरकरांनी मांडलेला आहे. न्या. रानडे यांच्यापासून चित्रे-नेमाडे यांच्यापर्यंत समग्र संतसाहित्य समीक्षेचा अभ्यास त्यांनी मांडलेला आहे. एकूणच जीवनमूल्ये व सौंदर्यमूल्ये यांची संत साहित्यातील संघटना स्पष्ट करण्याचे कार्य मंचरकरांनी केलेले आहे.

### ४.२ पंडिती परंपरेचे स्वरूप :-

सर्व मतमतांतराचा विचार करून र. बा. मंचरकर यांनी पंडिती कवितेची संकल्पना निश्चित केलेली आहे. अभिजातवादी दृष्टीने त्यांनी पंडिती परंपरेचा अभ्यास केलेला आहे. एकूण पंडिती काव्याच्या वैशिष्ट्याची उकल केलेली आहे. भामहापासून विश्वनाथापर्यंतच्या काव्यमीमांसकाची काव्यचर्चा इ. संश्लिष्ट स्वरूपात दिलेली आहे. विदग्ध महाकाव्याचे सर्वोत्कृष्ट उदाहरण म्हणून त्यांनी सामराजाच्या

'रूक्मिणीहरण' चा अभ्यास केलेला आहे. (त्याचे संपादनही त्यांनी केलेले आहे.) सामराजाने विदग्ध महाकाव्याचे तंत्र जरी बारकाईने पाळले असले तरी ते अव्वल दर्जाचे महाकाव्य ठरू शकत नाही याचाच निर्वाळा त्यांनी दिलेला आहे.

संस्कृत तसेच मराठी पंडित कवींची त्यांनी तुलना केलेली आहे. महाकवी कालिदासाच्या कल्पनांची इतरांनी कशी मुक्त उचल केली आहे हे त्यांनी दाखवून दिलेले आहे. 'माघ' काव्याचा भास्करभट्ट बोरीकर यांच्या 'शिशुपालवधा' वरील प्रभाव त्यांनी दाखवून दिलेला आहे. श्रीहर्षाने 'नैषधेयचरित्र' लिहून महाकाव्य परंपरा कशी समृद्ध केली हे दाखवून दिले आहे. नैषधकाव्याचे सारे सुबक सौंदर्य, सारगर्भ मराठीत पहायला मिळते ते रघुनाथ पंडित यांच्या 'दमयंतीस्वयंवरा' मध्ये हेच स्पष्ट केलेले आहे.

संस्कृत विदग्ध काव्याच्या पायवाटेवर मराठी पंडिती परंपरा यशोशिखर चढत गेली हेच त्यांनी दाखवून दिलेले आहे.

नरेंद्रापासून मोरोपंतांपर्यंतची पंडिती परंपरा मंचरकरांनी अभ्यासलेली आहे. महाकाव्य, काव्यप्रबंध, स्वयंवर, चंपू, संवादाख्याने, प्रणयाख्याने, रूपकाव्याने किर्तनादी अख्याने या पंडिती परंपरेचे त्यांनी सखोल विश्लेषण केलेले आहे. नरेंद्र, भास्करभट्ट बोरीकर, मुक्तेश्वर, सामराज, विठ्ठल, रघुनाथ पंडित, वामन पंडित, श्रीधर, मोरोपंत, निरंजन माधव इ. कवींचा अभ्यास त्यांनी सखोलतेने केलेला आहे, हेच दिसून येते.

युगप्रवर्तनातील मुक्तेश्वरी कवितेचा अनेकांशी तसेच वैविध्यपूर्ण अभ्यास त्यांनी मांडलेला आहे. नवी दृष्टी व सखोल तसेच चिकित्सक अभ्यास यांचा मेळ घालून मुक्तेश्वरी काव्याचे नवदर्शन घडविलेले आहे. दहा वर्षाच्या अखंड कष्टाचे फळ असणारा हा प्रबंध र. बा. मंचरकर यांनी कविवर्य वि. म. कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली सिद्ध केलेला आहे. या क्षेत्रातील मान्यवरांनी या प्रबंधाविषयीच खूपच चांगले अभिप्राय दिलेले आहेत.

### १) डॉ. रा. चिं. ढेरे -

"या प्रस्तुत प्रबंधामुळे या प्रमत्त प्रतिभेच्या कविश्रेष्ठाला प्रथमच उचित न्याय मिळालेला आहे. अत्यंत सुश्लिष्ट, आशयघन, मूळ रचनांतील अवतरणांची फुले आपल्या अंगावर माळणारी आणि आस्वादक नि विधायक वृत्तीने रंगलेली ही शैली प्रबंधविषयाची पूर्णत: सामरस्य साधणारी आहे. परीक्षणाचे भान गळून जावे, इतकी ती मोहक आहे."

### २) डॉ. यू. म. पठाण -

" प्रा.मंचरकर यांनी मूलगामी स्वरूपाचे विवेचन केले असून त्यामुळे प्राचीन मराठी साहित्य संशोधनात चांगली भर पडली आहे."

**४.३ धर्मसंप्रदाय आणि वाङ्मय :-**

**वीरशैव संप्रदायाचे संपादन :-**

धर्मसंप्रदाय व त्यातून निर्माण झालेले वाङ्मय हा मंचरकरांच्या आस्थेचा विषय आहे. 'वीरशैव संप्रदाय' या ग्रंथाचे सांक्षेपी संपादन करून त्यांनी वीरशैव संप्रदाय, साहित्य आणि समाजाची सर्वांगीण ओळख करून दिलेली आहे. या संप्रदायाचे उपास्यदैवत, तत्त्वज्ञान, आचारधर्म, सांप्रदायिकतेने नटलेले साहित्य, इतर संप्रदाय व महाराष्ट्राशी असलेला संबंध इ. या ग्रंथाचा व्याप आहे.

**४.४ साहित्यिक भूगोल :-**

'साहित्यिक भूगोल' ही र. बा.मंचरकर यांनी नव्याने मांडलेली संकल्पना आहे. साहित्य आणि संस्कृती यांच्या अभ्यासात ज्याप्रमाणे काळ हा घटक महत्त्वपूर्ण आहे. त्याचप्रमाणे 'स्थळ' हा घटकही विचारात घ्यावा लागतो. लेखकाच्या लेखणीतून त्या प्रदेशाचा मनोधर्म, जनजीवन, आणि स्वत्वच प्रकट होते यालाच 'साहित्यिक भूगोल' ही संकल्पना र. बा. मंचरकर यांनी वापरलेली आहे.

अहमदनगर, कोल्हापूर, कोकण इ. ठिकाणी होणारी साहित्यनिर्मिती, तिचा तपशील, त्याचे वेगळेपण व मराठीच्या साहित्यिक भूगोलातील वाटा यांचाही त्यांनी तपशीलवार अभ्यास केलेला आहे.

**४.५ वाङ्मयाचा इतिहास :-**

मध्ययुगीन वाङ्मयाचा अेनकांगी अभ्यास करताना मंचरकरांनी इतिहासाचाही विचार केलेला आहे. उपलब्ध मराठी वाङ्मय इतिहासाची त्यांनी छाननी केलेली आहे व त्याविषयी असमाधान व्यक्त केले. वाङ्मयाच्या इतिहासाची छाननी करताना कोणत्या समस्या उपलब्ध होतात त्यांचे निवारण कसे केले जाते याची विस्तृत चर्चा त्यांनी केलेली आहे. साहित्यिक इतिवृत्ताची उपलब्धता आणि अनिश्चितता, साहित्येतिहासाची सामग्री, साहित्यदृष्टीने उणे-अधिक, उचित साहित्यदृष्टीचा शोध, परंपरा, धर्मसंप्रदाय व साहित्य, राजसत्ता व साहित्य, साहित्यिक भूगोल अशा विविध मुद्द्यांचा सूक्ष्म अभ्यास केलेला आहे. भूतकाळ व वर्तमानकाळ यांना एकत्र आणणारा तसेच मराठी समाज, संस्कृती भाषा आणि साहित्य यांचा एकात्म वेध घेणारा मध्ययुगीन मराठी साहित्याचा इतिहास आकाराला येईल या अपेक्षेनेच समारोप केलेला आहे. कालखंडाचा अभ्यास करताना कालविभाजन कसे करावे याची उद्बोधक चर्चा केलेली आहे. कालखंडाचा अभ्यास करताना साहित्यकृती, लेखक, साहित्यप्रकार यांचा अभ्यास त्यांनी मांडलेला आहे.

**४.६ तौलानिक साहित्य :-**

तौलानिक साहित्य ही साहित्याभ्यासाची एक अंतरविद्याशाखा आहे. ही शाखा मराठी साहित्यात रूजविण्याचा प्रयत्न ज्यांनी केला त्यातीलच एक तत्त्वचिंतक म्हणजे र. बा. मंचरकर हे आहेत. साधारणत: १९६८ पासून त्यांनी तुलनात्मक अभ्यासास सुरूवात केलेली आहे. त्यांनी स्वत:च्या मुक्तेश्वरावरील

प्रबंधात महाभारत, रामायण, पुराणे यांचे संस्कृत, प्राकृत तसेच विविध भारतीय भाषातील आविष्कार लक्षात घेऊन तुलना केलेली आहे. विविध मतमतांतरांना बाजूला सारून त्यांनी तौलानिक साहित्याचे स्वरूप स्पष्ट केलेले आहे. तौलानिक साहित्याच्या उदयाचा विचार करून त्यांच्या अभ्यासाची राष्ट्रीय आणि अंतराष्ट्रीय पार्श्वभूमी विषद केलेली आहे. एकोणिसाव्या शतकापासून एकविसाव्या शतकापर्यंत तौलानिक साहित्याभास कस-कसा बदलत गेला याचाही विचार मांडलेला आहे. राष्ट्रीय साहित्य, सर्वसाधारण साहित्य आणि विश्वसाहित्य यासंदर्भात तौलानिक साहित्याचा व्यवच्छेदक अभ्यास केलेला आहे.

संस्कृत, प्राकृत, अपभ्रंश, फार्सी, इंग्रजी तसेच इतर भारतीय भाषा यांच्यातील वाङ्मयीन संबंध दाखवून दिलेले आहेत. डॉ. मंचरकरांनी तौलानिक दृष्टीने मराठी कथा-कवितांचा मागोवा घेतलेला आहे. तौलानिक अभ्यास ही मध्ययुगीन वाङ्मयाची अंगभूत गरज आहे हे जाणूनच वाङ्मयाचे दर्शन घडविलेले आहे. साहित्यमीमांसा आणि वाङ्मयतेतिहास यांना अधिक पूर्णता देणारा हा साहित्याभ्यास आहे.

### ४.७ कवी आणि कविता :-

कवी आणि कविता यांचा अभ्यास करताना काव्यास्वादाची प्रक्रिया र. बा. मंचरकर यांनी उलगडून दाखविलेली आहे. कवितेचे प्राकृतिक रूप, तिचे आशयद्रव्य, लयबद्धता, भाषा, कवीचे व्यक्तिमत्त्व यांची विशिष्टता स्पष्ट केलेली आहे.

कवितेच्या भाषेचा त्यांनी स्वतंत्र विचार केलेला आहे. भाषिक संहितेचा अभ्यास करताना अलंकार, वक्रोवत्ती, रीती, ध्वनी या संस्कृत काव्यलक्षणांचा परामर्श घेतलेला आहे. त्याचप्रमाणे प्रतिमा, प्रतिके, रूपक, परसंदर्भता, नियमोल्लंघन, ताण, विरोधाभास अशा काव्यभाषेशी संलग्न असलेल्या संकल्पनांचा परिचय करून दिलेला आहे.

यशवंत, ग. दि. माडगूळकर इ. काव्याचा यथायोग्य परामर्श घेतलेला आहे. खंडकाव्य या संकल्पनेचा सखोल अभ्यास करून या संकल्पनेची अनिलांच्या खंडकाव्याच्या संदर्भात पडताळणी केलेली आहे. नवोदित कवींच्या काव्याचे परीक्षण करताना ही कविता मूक होणार नाही याचाच विचार मांडलेला आहे.

### ४.८ कथा आणि कथाकार :-

नवकथेच्या संदर्भात र. बा. मंचरकर यांनी अरविंद गोखले यांच्या 'मंजुळा' मधील कथांचा वेध घेतलेला आहे. विषय, अनुभवविश्व, पात्रे, वातावरणनिर्मिती इ. संदर्भात नवकथेची विविधता अधोरेखित केलेली आहे. त्याचबरोबर आत्मकेंद्रित निवेदन, चमत्कृती प्राधान्यामुळे कथांना ज्या मर्यादा येतात

यातील उणीवाही दाखवून दिलेल्या आहेत. परंतु याचबरोबर सातत्य, प्रयोगशीलता इ. गुणांकडे लक्ष वेधलेले आहे. अरविंद गोखले यांच्या संस्कारसंपन्न मध्यमवर्गीय मराठी कथेने नव्या आणि जुन्या कथेला एकत्र आणलेले आहे.

मराठी नवकथेच्या संदर्भात आनंद घाटुगडे यांच्या मराठी कथेचा गौरव केलेला आहे. कुमारकथेतील जीवनजाणीवा प्रौढांनाही कशा आस्वाद्य ठरतात हेच येथे त्यांनी दाखवून दिलेले आहे. अनेक साहित्यप्रकार हाताळणाऱ्या लेखकांच्या बाबतीत त्या त्या लेखनाची वैशिष्ट्ये एकमेकांशी कशी संवाद-विरोध साधतात हेही मंचरकरांनी दाखवून दिलेले आहे.

प्रतिमा इंगोले यांच्या 'लेक भुईची' या कथासंग्रहाचे कलात्मक परीक्षण केलेले आहे. प्रतिमा इंगोले यांची कथा शहरी व ग्रामीण पार्श्वभूमीवर कसा संघर्ष निर्माण करते हेच त्यांनी मांडलेले आहे. शहरांकडून खेड्यांचे होणारे आर्थिक शोषण, शहरी झुलाव्यांचे ग्रामीण मनाला वाटणारे आकर्षण, संस्कृतीतील भिन्नता यांवर त्यांनी नेमकेपणाने बोट ठेवलेले आहे. प्रतिमा इंगोले यांच्या कथेतील नव्या स्त्रीवादी मूल्यांची जुन्या देशी शैलीशी सांगड घालण्याचा प्रयत्न र. बा. मंचरकरांनी केलेला आहे.

### ४.९ कादंबरी आणि कादंबरीकार : -

कादंबरीच्या कलारूपाचा र. बा. मंचरकरांनी कोणत्या दृष्टिकोणातून विचार केलेला आहे यातील संवेदनशीलता आनंद यादव यांच्या 'गोतावळा' मधून दिसून येते. माणूस आणि प्राणीसृष्टी यांच्यातील नात्याचा त्यांनी आपल्या समीक्षेतून वेध घेतलेला आहे.

गो. नी. दांडेकर यांच्या वाङ्मयीन वाटचालीतील एक अढळ स्थान म्हणून ओळखली जाणारी 'शितू' ची आगळी वेगळी वाङ्मयीन वैशिष्ट्ये त्यांनी दाखवून दिलेली आहेत. कादंबरीकडून नाटकाकडे वळणारा रस्ताही त्यांनी स्पष्ट केलेला आहे. 'शितू' मुळे प्रादेशिक कादंबरीची पायवाट एक हमरस्ता झालेला आहे हेच दाखवून दिलेले आहे.

वेदना आणि विद्रोह यांचे विविधांगी जीवनदर्शन घडविणारे अण्णाभाऊ साठे यांच्या 'फकिरा' कादंबरीचे कलात्मक विश्लेषण मंचरकरांनी केलेले आहे. या कादंबरीचा रूपबंध त्यांनी आकृतीच्या सहाय्याने स्पष्ट केलेला आहे. यांमध्ये अण्णाभाऊंच्या जीवनदर्शन घडविण्यावर त्यांनी लक्ष केंद्रित केलेले आहे.

मराठी कादंबरीच्या पटावर अरूण साधूंचे स्थान निश्चित करणारी समीक्षा र. बा. मंचरकर यांनी केली आहे. मराठी कादंबरीकारांमध्ये असणारे दुर्मिळ गुण अरूण साधू यांच्यामध्ये असूनही त्याचा पूर्णाविष्कार मात्र झालेला नाही. परंतु त्यांचे लेखन निश्चितच आश्वासक आहे हे मंचरकरांनी दाखवून दिलेले आहे. बाबा पद्मनजी, हरिभाऊ आपटे, वामन मल्हार, श्री. व्यं. केतकर या परंपरेतील सामाजिक प्रभाव अरूण साधूंच्या लेखनात सैल जाणवतो हे स्पष्ट केलेले आहे.

'सत्तांतर - एक पुननिर्मिती' ही व्यंकटेश माडगूळकर यांच्या 'सत्तांतर' कादंबरीची मंचरकरांनी केलेली समीक्षा वैशिष्ट्यपूर्ण आहे. व्यंकटेश माडगूळकर यांच्या सत्तांतर या कादंबरीबद्दल जे अनेक वाद निर्माण झालेली होते या वादांत मंचरकरांच्या या विवेचनाला 'अखेरचा शब्द' या न्यायाने प्रतिष्ठा मिळाली.

### ४.१० विष्णूशास्त्री चिपळूणकरांचे तीन निबंध :-

'विद्वत्त्व आणि कवीत्त्व', 'इतिहास', 'आमच्या देशाची स्थिती' हे तीन निबंध विष्णूशास्त्री चिपळूणकर यांच्या वाङ्मयीन कारकिर्दीतील मैलाचे दगड आहेत. या निबंधांचे वाङ्मयीन व वैचारिक पातळीवर समीक्षण केलेले आहे.

१) 'विद्वत्त्व आणि कवीत्त्व' या निबंधाच्या अनुषंगाने र. बा. मंचरकरांनी मराठी समीक्षेच्या आदिपर्वाची चर्चा केलेली आहे. यातून विष्णूशास्त्री चिपळूणकर यांचे वाङ्मयीन कर्तृत्त्व सिद्‌ध केलेले आहे.

२) 'इतिहास' या निबंधाचे मूल्यमापन त्यांनी परिवर्तनाच्या आधारे केलेले आहे.

३) 'आमच्या देशाची स्थिती' हा निबंध म्हणजे सांस्कृतिक राष्ट्रवादाचा जनक आहे हेच स्पष्ट केलेले आहे. विष्णूशास्त्री चिपळूणकरांचे दुहेरी विश्व उलगडून दाखविण्याचे कार्य त्यांनी केलेले आहे. चिपळूणकरांची जडण-घडण, व्यक्तिमत्त्वाची वैशिष्ट्ये, देशी परदेशी संस्कार यांचेही मूल्यमापन केलेले आहे.

### ४.११ चरित्र-आत्मचरित्र- प्रवासवर्णन :-

ग. दे. खानोलकरांनी 'साहित्यसिंह' मधून श्री. कृ. कोल्हटकरांची जीवनगाथा मांडलेली आहे. तिच्या परीक्षणात डॉ. मंचरकरांनी चरित्रग्रंथाला प्रमाणता कशामुळे येते याची चर्चा केलेली आहे. त्यातून कोल्हटकरांच्या जीवनदर्शनाचे वास्तव विषद केलेले आहे.

'सोनजातक' या रतनलाल सोनग्रा यांच्या दलित आत्मचरित्राला डॉ. र. बा. मंचरकर यांनी प्रस्तावना लिहिलेली आहे. यातून त्यांनी आत्मचरित्रांचे स्वरूप, दलित आत्मचरित्रांची वैशिष्ट्ये तसेच 'सोनजातक' चे वेगळेपण यांची चर्चा केलेली आहे. आत्मचरित्रांच्या पार्श्वभूमीवर 'सोनजातक' चा देशी घाट त्यांनी दाखवून दिलेला आहे.

'शरावती - एक प्रवास चित्रण' या माध्यमातून त्यांनी प्रवासवर्णाचे स्वरूप विषद केलेले आहे. लेखकाचे व्यक्तिमत्त्व आणि स्थळ यांच्यातून प्रवासवर्णन कसे आकाराला येते हेच दाखवून दिलेले आहे.

### ४.१२ नवप्रवाह :-

''मराठी साहित्याचे वाचक जसे बदलत गेले तसे मराठी साहित्याचे स्वरूप बदलत गेले.'' (पृष्ठ २१३) अशा एक सूत्रात र. बा. मंचरकर यांनी नवप्रवाहांचा उगम शोधलेला आहे. नववाङ्मयीन प्रवाहांचे समर्थन करताना त्यांचे श्रेयही नोंदविलेले आहे. नवप्रवाहांच्या बदलणाऱ्या भूमिकांचीही चर्चा

त्यांनी केलेली आहे. स्वातंत्र्योत्तर ग्रामीण साहित्यातील जीवन जाणीवा त्यांनी संबंधाचा चढता-उतरता आलेखच त्यांनी मांडलेला आहे. या दोन्ही जाणीवांचा समंजस तोल व्यंकटेश माडगूळकर, उद्धव शेळके, हमीद दलवाई यांनी सहजप्रतिभेने सांभाळले आहे हेच दाखवून दिलेले आहे.

शंकर पाटील, आनंद यादव, रा. रं. बोराडे, सखा कलाल यांच्या लेखनातील कलात्मक जाणीव स्पष्ट केलेली आहे. यानंतर कलात्मक जाणीवा नाकारून सामाजिक जाणीवांना अग्रस्थान देणारा अण्णाभाऊ साठे, महादेव मोरे, चारूता सागर यांचा तिसरा गटही दाखवून दिलेला आहे. या टप्प्यांच्या द्वारे बदलत्या जीवनवास्तवाचा आणि कलादृष्टीचा संदर्भ त्यांनी स्पष्ट केलेला आहे.

दलित कथा आणि ग्रामीण कथा यांच्यातील साम्यापेक्षा भेदावर भर देणारी तुलना मंचरकरांनी केलेली आहे. दलित साहित्याचे ग्रामीण व शहरी असे दोन भाग केलेले आहेत. अण्णाभाऊ साठे यांचा अपवाद वगळता दलित कथेत प्रेम चित्रणाला वाव मिळालेलो दिसत नाही. दोन्ही कथाकार जीवनाचेच दर्शन घडवितात. परंतु या जीवन स्वरूपावर दलित कथाकार जेवढा भर देतात तेवढा भर ग्रामीण कथाकार देत नाहीत हे दाखवून दिलेले आहे. या भेदांची कारणमीमांसा त्यांनी केलेली आहे.

व्यंकटेश माडगूळकर, शंकर पाटील, द. मा. मिरासदार, आनंद यादव, उद्भव शेळके, रा. रं. बोराडे, भास्कर चंदनशीव, इ. ग्रामीण कथाकार तसेच शंकरराव खरात, बाबूराव बागूल, केशव मेश्राम, योगीराज वाघमारे या दलित कथाकारांचा तुलनात्मक अभ्यास मांडलेला आहे.

### ४.१३ स्त्रीवादी साहित्य आणि समीक्षा :-

स्त्रीवादी साहित्य व समीक्षेचा विचार मंचरकरांनी महदंबेपासून मांडलेला आहे. जनाबाई, मुक्ताबाई, बहिणाबाई यांच्या लेखनातून स्त्रीत्त्वाचे दुःख भेदकपणे दिसून आलेले आहे. एकूणच स्त्रीवादी विचारप्रवाह मंचरकरांनी स्पष्ट केलेला आहे. ताराबाई शिंदे यांच्या लेखनाची आवश्यकताही प्रकट केलेली आहे.

कलारूपावर पकड असणाऱ्या परंतु एकूण जाणीवा धूसर वाटणाऱ्या लेखिका, जाणीवा प्रखर परंतु कलारूप क्षीण असणाऱ्या लेखिका तसेच आंतरिक व बाह्य वास्तव जाणीवांना अकृत्रिम कलारूप देणाऱ्या लेखिका असे स्त्रीवादी साहित्य प्रवाहचे तीन गट नव्याने स्पष्ट केलेले आहेत.

लक्ष्मीबाई टिळक, बहिणाबाई, इंदिरा संत, दुर्गा भागवत, इरावती कर्वे, विभावरी शिरूरकर, कमल देसाई, गौरी देशपांडे, प्रिया तेंडुलकर, आशा बगे, विजया राजाध्यक्ष, सानिया इ. लेखनाचा मंचरकरांनी विचार केलेला आहे.

### ४.१४ समीक्षा विचार :-

आपल्या समीक्षा विचारात मंचरकरांनी साहित्य समीक्षकांचा परिचय व परामर्श घेतलेला आहे. श्रीपाट कृष्ण कोल्हटकर यांच्या टीकालेखनाची सैद्धांतिक मांडणी मंचरकरांनी केलेली आहे.

"आनंद हे प्रयोजन, वैचित्र्य हा आत्मा व वाचक प्रेक्षकांवरील परिणाम हे लक्ष्य असे गृहीत धरून कोल्हटकर साहित्याचे स्वरूप ठरवितात." ( पृष्ठ २२४ ) हे दाखवून दिलेले आहे. कोल्हटकरांच्या साहित्य प्रयोजन विचाराचीही मंचरकरांनी समीक्षा केलेली आहे.

आनंदवादी, आशयवादी, तंत्रवादी, रूपकवादी आणि जीवनवादी अशा विचारांची संमिश्रता कोल्हटकरांच्या साहित्य मीमांसेत आहे, हेच मंचरकरांनी स्पष्ट केलेले आहे.

गो. म. कुलकर्णी यांच्या समीक्षेचा आत्मियतेने परंतु चिकित्सक अभ्यास 'परिचय आणि परामर्श' र. बा. मंचरकर यांनी ग्रंथरूपाने मांडलेला आहे. गो. म. कुलकर्णी यांच्या लेखनाची त्यांनी पुनर्मांडणी केलेली आहे.

रा. चिं. ढेरे यांच्या शंभराहून अधिक ग्रंथांचा तसेच असंकलित लेखांचा चिकित्सक परामर्श मंचरकरांनी घेतलेला आहे. एकूणच ढेरे यांच्या वाङ्मयदर्शनात मंचरकरांच्या विधायक दृष्टीचे दर्शन घडते, हेच स्पष्ट झालेले आहे.

नरहर कुरूंदकर यांच्या मध्ययुगीन मराठी साहित्यसमीक्षेची परखड तपासणी र. बा. मंचरकर यांनी केलेली आहे. ह. श्री. शेणोलीकर यांच्या "प्राचीन मराठी वाङ्मयाचे स्वरूप" या इतिहासग्रंथाचा मंचरकरांनी काटेकोर अभ्यास केलेला आहे. तसेच द. भि. कुलकर्णी आणि रा. ग. जाधव यांच्या समीक्षेच्या सामर्थ्याची तसेच मर्यादांचीही चर्चा केलेली आहे.

## ४.१५ साहित्य विचार :-

संस्कृत काव्यशास्त्राचा मंचरकरांनी स्वतंत्र विचार केलेला आहे. मूळातच संस्कृत काव्यशास्त्रामध्ये प्रमुख दोन ठळक प्रवाह आहेत. १) लौकिकतावादी २) अलौकिकतावादी. हे दोन प्रवाह ज्या वेगळ्या मुद्यांवर एकमेकांशी विरोध दर्शवितात त्यांचे महत्त्वपूर्ण टिपण दिलेले आहे. संस्कृत काव्यशास्त्राचे मराठीमध्ये अवतरण होत असताना त्यातील, कमी-जास्त शोधणारे लेखन त्यांनी दिलेले आहे. मराठी काव्यशास्त्रातील एकूण गफलतींचा शोध घेतलेला आहे. यादृष्टीने रा. श्री. जोग यांच्या 'अभिनव काव्यप्रकाश' चा अभ्यास मांडलेला आहे.

## ४.१६ साहित्याचे संशोधन :-

वाङ्मयाच्या संशोधनाच्या दृष्टीने 'संशोधनाची समस्या' हा लेख महत्त्वाचा आहे. संहिताचिकित्सा, पाठशोधन, पाठनिश्चिती हेच साहित्य संशोधनाचे योग्य क्षेत्र असे मंचरकरांनी मानलेले आहे. या प्रत्येक प्रकारातील आणि पद्धतीचे मराठीत झालेले संशोधन आणि त्यातील कमी-जास्त यांची मार्मिक चर्चा केलेली आहे. पीएच. डी. साठी होणाऱ्या संशोधनाचा त्यांनी सविस्तर विचार केलेला आहे. परंपरेचा अभाव, पीएच.डी.कडे पाहण्याची बदललेली दृष्टी, एकूण ज्ञानव्यवहाराचे स्वरूप या मुद्द्यांचा त्यांनी

मूळातूनच विचार मांडलेला आहे. दुर्मिळ साधनांचा मागोवा, सामग्री संकलन, संहिता चिकित्सा, भाषेचे अनुवर्ती अध्ययन इ. संदर्भातील दिशादर्शन केलेले आहे.

**४.१७ भाषाशास्त्रविचार :-**

र. बा. मंचरकर यांच्या भाषेच्या शास्त्रीय अभ्यासाचे फलित म्हणजे त्यांचा 'भाषाशास्त्रविचार' हा ग्रंथ होय. सोरस्यूर, ब्लूमफिल्ड, हॉकेट, क्रिस्टर इ. जुन्या नव्या भाषावैज्ञानिकांच्या मतांचा त्यांनी सविस्तर परामर्श घेतलेला आहे. भाषा व बोली यांच्यातील संबंधांची उकल स्पष्ट केलेली आहे.

**४.१८ वाङ्मयेतर विषयावरील लेखन :-**

वाङ्मयाची रूची लावणारी आणि विद्यार्थ्यांची अभिरूची संस्कारसंपन्न बनविणारी अनेक पाठ्यपुस्तके मंचरकरांनी संकलित केलेली आहेत. कल्पकता, शिस्त आणि अभिनवता हीच त्यांच्या संपादकत्त्वाची वैशिष्ट्ये ठरलेली आहेत. 'कर्मवीर आणि अस्पृश्यता निवारण' हे त्यांचे संशोधन दखलपात्र ठरलेले आहे. अशा साक्षेपाने र. बा. मंचरकर यांनी मराठी साहित्य व समीक्षेचे क्षेत्र व्यापलेले आहे, हेच दिसून येते.

**५. र. बा. मंचरकर - व्यक्तिविशेष :-**

गौरवग्रंथाच्या दुसऱ्या विभागातून र. बा. मंचरकर यांच्या व्यक्तिगत जीवनाचे दर्शन घडून आलेले आहे. वर्गमित्र एन. एम. आव्हाड, कवी संतोष पवार, विद्यार्थी श्री. एकनाथ ढोणे, श्री. बाबासाहेब शेंडगे, कन्या सौ. अनुराधा यांच्या लेखनातून र. बा. मंचरकर यांचे व्यक्तीविशेष व सामाजिक तसेच सांस्कृतिक जीवनाचे पैलू स्पष्ट केलेले आहेत.

कवी संतोष पवार यांची र. बा. मंचरकर यांच्यावरील कविता त्यांच्या कार्यकर्तृत्वाचा यथोचित गौरव करणारी आहे. त्यांच्या ज्ञानाच्या व कार्याच्या वैशिष्ट्याचा परामर्श घेतलेला आहे.

र. बा. मंचरकर यांचे वर्गमित श्री. एन. एम. आव्हाड यांचा 'रत्नाकार' हा लेख मंचरकरांनी शाळकरी वयातील प्रगल्भता स्पष्ट करणारा आहे. गतजीवनातील आठवणींची मालिका उलगडून दाखविलेली आहे. मंचरकरांचे सुंदर हस्ताक्षर, विचारचिंतन, व्याकरण, निबंध, भाषांतर इ. प्रभुत्त्व, त्यांची अमोघ शैली यांचे दर्शन दिसून येते.

'आमचे सर' या एकनाथ ढोणे व बाबासाहेब शेंडगे यांच्या लेखातून मंचरकरांची जडण-घडण, व्यक्तीगत जीवन, वाङ्मयीन कर्तृत्व, त्यांनी मिळविलेले मान-मरातब इ. दर्शन घडून येते. या दोन्ही शिष्यांनी गुरूच्या समग्र कार्याचे अवलोकन केलेले आहे. विद्यार्थी दशेत त्यांनी कबड्डीच्या मैदानावर केलेल्या चढाया, वक्तृत्वाचे गिरवलेले धडे, उत्तमोत्तम व्याख्याने, कॅरम-बुद्धिबळात पटकाविलेली बक्षिसे हे सर्व दिसून येते. रा. श्री. जोग, रा. शं. वाळिंबे, शं. गो. तुळपुळे, गो. न. कुलकर्णी, दु. का. संत

यांच्याशी जोडल्या गेलेल्या स्नेहाचे दर्शन घडून येते. मंचरकर सरांनी भाषा, साहित्य, समाज आणि संस्कृती इ. क्षेत्रात केलेल्या कार्याचा वेध घेतलेला दिसून येतो.

१६ जून १९६६ या दिवशी र. बा. मंचरकर यांनी 'रयत' च्या विशाल परिवारात केलेला प्रवेश आणि त्यांचे व्यक्तिगत जीवनातील यश यांचा परामर्श घेतलेला आहे. ''आपण रयतमध्ये नसतो तर जास्त लिहिता आले असते परंतु माणूस म्हणून कच्चे राहिलो असतो.''[६] हे मंचरकरांचे विचार स्पष्ट झालेले आहेत.

एरव्ही प्रेमळ वाटणारे मंचरकर सर संशोधनाच्या बाबतीत कसे कठोर व शिस्ती बनतात, हे ही दिसून येते. विषयाची निवड, सूचीकरण, वाचनाचे संयोजन, टिपणे काढण्याची पद्धती, अभ्यासाच्या पद्धती समजून देत हेच स्पष्ट झालेले आहे. मार्गदर्शक व संशोधक यांच्यातील ज्ञानव्यवहाराला दिलेली शिस्त दिसून येते. महाराष्ट्र शासनाचे दोन राज्य पुरस्कार, तीन जीवनगौरव पुरस्कार आणि यासह एकूण ६७ पुरस्कार, प्राध्यापक, संपादक आणि समीक्षक म्हणून रत्नाकर मंचरकर यांनी गाजविलेल्या बहुविध कर्तृत्वाचा परामर्श घेतलेला आहे.

र. बा. मंचरकर यांच्या कन्या सौ. अनुराधा यांनी 'लेकीच पत्र' हा पत्रवजा लेख त्यांचे व्यक्तीविशेष दाखविणारा आहे. वडिलांच्या सेवानिवृत्ती निमित्त होणारे दु:ख आणि त्याचबरोबर होणारा अनंद आणि याचनिमित्ताने आपल्या व्यक्तिगत आयुष्यातील वडिलांचे अढळ स्थान व त्यांच्या एकूणच वाङ्मयीन कर्तृत्त्वाचा त्यांनी केलेला गौरव आलेला आहे.

त्यांच्यासारखे हुशार, प्रतिभावान, बहुआयामी 'बाबा' लाभल्याबद्दल सौ. अनुराधा यांनी स्वत:चे सद्भाग्य आणि परमेश्वराचे आभारच मानलेले आहेत; आणि याची जाणीव आपल्याला थोडीशी उशीराच झाली याची खंत बाळगलेली आहे. वडिलांची ओघवती भाषणे, वेळोवेळी सर्व भावंडांचे केले जाणारे कौतुक, कॉलेजमधून येतानाही मुलांसाठी आणला जाणारा खाऊ इ. गोष्टींची त्यांनी आठवण करून दिलेली आहे ; हेच दिसून येते. रत्नाकर मंचरकर यांच्या व्यक्तिगत आयुष्यातील त्यांचा स्वभाव तसेच त्यांचे आचरण, त्यांचा प्रगाढ अभ्यास, मुलांच्यावर असणारे लक्ष इ. बारकाईने दर्शन येथे घडविले आहे. याही वयात आयुष्यातील छोट्या-मोठ्या वळणावरच्या गंमती जमतींचे, वडिलांनी केलेले मार्गदर्शन आणि यासर्व गोष्टींबद्दलची कृतज्ञात दिसून येते.

जून महिन्यात चारही मुलांची शाळा खरेदी, रविवारी केली जाणारी 'कोल्हापूर सहल', बँक शब्द लिहिता येत नाही अशा वयात बँकेचे उघडून दिलेले खाते इ.मजेशीर वर्णन आलेले आहे. बारावीनंतर 'अनु'ला कलाशाखेत येण्याबद्दल आग्रह आणि तिच्या हट्टासमोर हतबल होणारे मंचरकर, तसेच अभ्यासाचे वेळोवेळी पटवून दिले जाणारे महत्त्व, एम्.एस्सीला अनुला मिळालेले ॲडमिशन व त्यातून

बाबांना झालेला आनंद तसेच बी.एड्. च्या वेळी फलक लेखनात मार्गदर्शन करणारे वडिल इ. गोष्टीतून मंचरकर सरांच्या व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू येथे दिसून येतात व एक प्रेमळ पिता या नात्यानेच त्यांचा गौरव केलेला आहे.

अनुच्या लग्नानंतर आनंदित झालेले बाबा, परंतु मुलीच्या पहिल्या बाळाच्या मृत्यूनंतर व्यथित होऊनही तिला धीर देताना 'शापीत वासू'ची सांगितलेली गोष्ट यातून मंचरकर सरांच्या स्वभवाचे विविध पैलू उलगडून दाखविलेले आहेत. पीएच. डी. साठी मुलीला धीर देणारे बाबा, तिला संसारोपयोगी चार गोष्टी सांगणारे वडिल आणि याबद्दल मुलीला वाटणारी प्रचंड कृतज्ञता इ. विविधांगी दर्शन घडविलेले आहे.

वडिलांच्याबरोबरच आईचेही प्रेमळ दर्शन घडविले आहे; हेच दिसून येते. वडिल शैक्षणिक कामानिमित्ताने बाहेर गेले असताना आईने मुलांसाठी केलेली खरेदी व जीवनातील सर्वोत्तम दिवाळीचे दर्शन घडविलेले आहे.आयुष्याच्या उतरणीवर आई-वडिलांनी एकमेकांची केलेली निवड सार्थ ठरविलेली आहे.

नोकरीच्या निमित्ताने विविध भागात फिरताना मंचरकर सरांनी आपल्या स्वभावाने जोडलेली माणसे, नव्याने निर्माण केलेली नातेबंध इ. दर्शन येथे घडून येते. पत्राच्या शेवटी आई-वडिलांनी एकमेकांची काळजी घेण्याचा दिलेला सल्ला आणि नवीन लेखनासाठी सरांना दिलेल्या शुभेच्छा तसेच दोघांच्या दीर्घायुसाठी केलेले हितचिंतन याने पत्राचा शेवट झालेला आहे.

एकूणच र. बा. मंचरकर यांच्या गौरवग्रंथातील हा एक पत्रवजा महत्त्वपूर्ण लेख आलेला आहे. वडिलांच्या गौरवग्रंथाच्या निमित्ताने त्यांना अर्पण केलेली ही खरीखुरी गौरवांजली आहे !

एकूणच गौरवग्रंथाच्या दुसऱ्या विभागातून र. बा. मंचरकर यांचे व्यक्तीविशेष दिसून येतात. एका समीक्षकाचे व्यक्तिगत पातळीवरील 'माणूस' म्हणून आकलन आलेले आहे.

एकूणच पाहता 'साहित्याचा अभ्यास' हा र. बा. मंचरकर यांचा गौरवग्रंथ त्यांच्या व्यक्तिगत जीवनाबरोबरच समग्र वाङ्मयीन कर्तृत्त्वाचा आलेख स्पष्ट करणारा आणि समीक्षात्मकदृष्ट्या साहित्याच्या अभ्यासकाला मार्गदर्शन करणारा गौरवग्रंथ आहे.

'साहित्याचा अभ्यास' या गौरवग्रंथाची मांडणी लक्षात घेता हे लेखन जरी निमित्ताने झाले तरी यातील 'गौरवमूर्ती' ज्या क्षेत्राशी निगडीत आहे त्या क्षेत्राचे व्यापक संदर्भमूल्य लाभलेले आहे. संपादित स्वरूपात असणाऱ्या या गौरवग्रंथातून साहित्य व समीक्षेच्या विविध अंगोपांगाचा अभ्यास आलेला आहे; त्याचबरोबर गौरवास पात्र ठरविलेल्या 'गौरवमूर्तींच्या' व्यक्तिगत जीवनाचे आकलन झालेले आहे. व्यक्तिगत पातळीवर माणूस म्हणून होणारे आकलन तसेच सामाजिक, सांस्कृतिक व्यक्तिमत्त्वाचे पैलू दिसून आलेले आहेत.

काळानुसार समाजात घडून आलेले बदल आणि समाजातील बदलानुसार साहित्यातील आशय व कलारूपांमध्ये बदल घडून आल्यामुळेच साहित्य काहीसे वादग्रस्त संकल्पनाचे क्षेत्र बनत चालले आहे. परंतु या बदलणाऱ्या संकल्पनांचा आशयाच्या संदर्भात वेध घेण्याचे जे कार्य समीक्षा क्षेत्रात चालते त्याचाच वेध घेण्याचा प्रयत्न झालेला आहे.

**निष्कर्ष :-**

१) 'साहित्याचा अभ्यास' हा गौरवग्रंथ र. बा. मंचरकर यांच्या व्यक्तिगत जीवनाबरोबरच त्यांच्या वाङ्मयीन कर्तृत्वाचा गौरव करणारा आहे.

२) समीक्षादृष्ट्या विविध अंगोपांगांचा एकाचवेळी समीक्षात्मक न्याय देण्याचे कार्य प्रस्तुत गौरवग्रंथातून केले गेलेले आहे.

३) अभ्यास आणि समीक्षा एकच मानून या पातळीवर साहित्याचा अभ्यास मांडलेला आहे.

४) साहित्यकृतीच्या संदर्भात निकष आणि मूल्ये यांचा आगळा-वेगळा विचार मांडलेला आहे. उदा. 'एन्कीच्या राज्यात' या कादंबरीच्या संदर्भात सौंदर्यमूल्याहून अधिक महत्त्व जीवनमूल्यांना दिलेले आहे.

५) साहित्याचा अभ्यास हा गौरवग्रंथ महाविद्यालयीन विद्यार्थ्यांपासून पीएच्.डी. पर्यंत संशोधन करणाऱ्या अभ्यासकापर्यंत मार्गदर्शन करणारा आहे.

६) समीक्षेच्या दृष्टिकोणातून अध्ययन-अध्यापन, लेखन इ. क्षेत्रामध्ये प्रवेश करू इच्छिणाऱ्या अभ्यासकांसाठी हा उपयुक्त संदर्भ ग्रंथ आहे.

७) वर्गमित्र एन. एम. आव्हाड, श्री. एकनाथ ढोणे, सौ. अनुराधा बंगाळ यांच्या लेखांमधून र. बा. मंचरकर यांच्या सामाजिक सांस्कृतिक जीवनाचे पैलू दिसून येतात.

८) 'साहित्याचा अभ्यास' हा निरपेक्ष गुरूच्या गौरवमाध्यमातून साहित्याचा अभ्यास करण्यासाठी उपयुक्त संदर्भ ग्रंथ आहे.

९) प्रबंध लेखन विद्या सचोटीने आत्मसात करावी याचे दिग्दर्शन प्रस्तुत ग्रंथातून झालेले आहे.

१०) विशिष्ट कालखंडाच्या अभ्यासात युगधर्म आणि साहित्य यांच्यातील नाते शोधण्यावर भर दिलेला आहे.

११) लेखकाचा अभ्यास संवेदनशीलता, अभिरूची, पिंडधर्म, आणि परिप्रेक्ष्य यांच्या चौकटीत मांडलेला आहे.

## संदर्भ सूची


१) मंचरकर र. बा. सद्‌भाव समिती (संपा.), साहित्याचा अभ्यास, प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती २००३, बागले प्रभाकर, साहित्याचा अभ्यास (लेख) पृष्ठ २.

२) तत्रैव, बागले प्रभाकर यांचा साहित्याचा अभ्यास हा (लेख) पृष्ठ १३.

३) तत्रैव, कवठेकर बाळकृष्ण, लेखकाचा अभ्यास हा (लेख) पृष्ठ ६३.

४) तत्रैव, देशपांडे सुधाकर, प्रबंधलेखन रीती हा (लेख), पृष्ठ १५०.

५) तत्रैव, भालसिंग वैशाली, रत्नाकर मंचरकर यांचे समीक्षालेखन हा (लेख) पृष्ठ १६८.

६) तत्रैव, ढोणे एकनाथ - शेंडगे बाबासाहब यांचा आमचे सर हा (लेख) पृष्ठ २६४.


----x----